# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ / चैत्र १, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(४)** | **नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या गट "क" सेवा मुख्य परीक्षेच्या भरती प्रक्रियेस दिलेली स्थगिती

**(१) * ४३७९८ डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) गट "क" सेवा मुख्य परीक्षा सन २०१९ मध्ये कर सहाय्यक, लिपिक टंकलेखक व दुय्यम निरीक्षक या ३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली असून सदर पदांची भरती प्रक्रिया न्यायालयीन स्थगिती आणि कोवीड महामारीमुळे गत २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरतीप्रक्रियेत सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग (SEBC) आरक्षण असल्यामुळे आणि या प्रवर्गाच्या आरक्षणावरील मा.न्यायालयीन स्थगितीमुळे पात्र उमेदवारांना शासनाकडून नियुक्ती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग आरक्षण रद्द केल्यामुळे शासनाने वेळोवेळी शासन निर्णय जारी करून प्रलंबित भरती प्रक्रियेला गती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या सुनावणीत १०% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक उमेदवारांच्या नियुक्तीचा प्रश्न उद्भवलेला असून सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्ग आरक्षण मधील ९०% उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतीही अडचण येत नसल्याने ऊर्जा विभागातील महावितरणच्या भरती प्रक्रियेमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या १०% उमेदवारांना वगळून इतर सर्व प्रवर्गातील ९०% उमेदवारांना नियुक्ती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच सन २०१९ मध्ये परीक्षा दिलेल्या कर सहाय्यक, लिपिक टंकलेखक व दुय्यम निरीक्षक या पदांसाठीची भरती प्रक्रिया १०% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना वगळून उर्वरित इतर सर्व प्रवर्गातील ९०% उमेदवारांच्या नियुक्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उद्धव ठाकरे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी अंतरिम आदेशान्वये एसईबीसी आरक्षणासह पदभरतीस स्थगिती दिली होती. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५.०५.२०२१ रोजी एसईबीसी आरक्षण रद्द केल्यानंतर दि.०९.०९.२०२० पासून एसईबीसी प्रवर्गासह स्थगित असलेली पदभरती राबविण्यासाठी शासनाच्या मागास वर्ग कक्षाच्या दि.०५.०७.२०२१ व १५.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

(४) महावितरण कंपनीने, दि. ०५.०७.२०२१ च्या शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन, एसईबीसी आरक्षण वगळून इतर प्रवर्गातील आरक्षणानुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही केली आहे.

अशी नियुक्ती करत असताना, ईडब्ल्यूएस आरक्षणासंदर्भातील याचिकेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशासंदर्भात ज्येष्ठ विधितज्ञांकडून प्राप्त कायदेशीर अभिप्रायानुसार, ईडब्ल्यूएस प्रवर्गातील १० टक्के पदांचा निकाल राखून ठेवून या पदांवर नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(५) प्रस्तुत प्रकरणी आयोगाने सन २०१९ मध्ये कर सहायक, लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक या ३ संवर्गासाठी परीक्षा घेतली. त्यानंतर आयोगाने या ३ संवर्गांचा निकाल दि.२८.०७.२०२० रोजीच्या शिफारसपत्राद्वारे संबंधित प्रशासकीय विभागांना कळविले होते.

तथापि मा.न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन आयोगाने सदर पदांकरीता सुधारित निकाल तयार करत असताना या ३ संवर्गांपैकी दुय्यम निरीक्षक या संवर्गाचा सुधारीत निकाल दि.१३.१०.२०२१ रोजी घोषित केला. सुधारित शिफारशी नुसार संबंधित प्रशासकीय विभागाकडून नियुक्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच लिपिक टंकलेखक व कर सहायक या दोन संवर्गाचा निकाल शिफारस पत्राद्वारे शासनास पाठविण्यापूर्वीच मा.उच्च न्यायालयाने शिफारसपत्रास स्थगिती दिली असल्याने आयोगाने अद्यापही या दोन संवर्गाचा सुधारीत निकाल घोषित केलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात तहसिल कार्यालयांतर्गत असलेली सेतू सुविधा केंद्र बंद असल्याबाबत

**(२) * ४१९५६ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात तहसील कार्यालयांतर्गत सुरु असलेले सर्वच एकात्मिक नागरी सेतू सुविधा केंद्र दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेतू सुविधा केंद्र बंद असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून विविध प्रमाणपत्रांसाठी अन्य ई- सेवा केंद्रांकडून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांना सातबारा उतारा व इतर विविध प्रमाणपत्राच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सेतू सुविधा केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उद्धव ठाकरे :** (१) हे खरे आहे. लातूर जिल्हयातील सेतू सुविधा केंद्रांच्या कराराची मुदत दि.३१.१२.२०२१ रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर सेतू केंद्रे दि.३१.१२.२०२१ पासुन बंद करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) लातूर जिल्हयातील सर्व तहसिलदारांना त्यांच्या तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रचालकांची वेळोवेळी बैठक घेऊन सर्व प्रकारच्या सेवा विहीत कालावधीत व विहीत शुल्क आकारुन देण्याबाबत तसेच वेळोवेळी आपले सरकार सेवा केंद्रांची तपासणी करणेबाबत व नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागातील गावांना जोडणारा पूल व जोडरस्त्याची झालेली दुरवस्था

**(३) * ४३५७७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीपट्टा भागातील सुमारे ५० गावांना जोडणारा कोटयवधी रूपये खर्च करून जगबुडी नदीवर देवणे येथे बांधण्यात आलेला पूल आणि जोडरस्त्याची एका वर्षातच अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाचे काम सुरू असतानाच हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणून देखील त्याची दखल न घेता संबंधित ठेकेदारास पाठिशी घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे काम ठेकेदाराने अदयापही अपूर्णावस्थेत ठेवले असल्याने संबधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पुलाच्या जोडरस्त्याचे काम क्षतिग्रस्त झाले.

संबंधीत कंत्राटदाराकडून पोच मार्गाची दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर मुख्य पुलाचे तसेच पूर्ण लांबीतील जोडरस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. पुलाचे रेलिंग व मोऱ्यांच्या भिंतीचे काम लवकरच पूर्ण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) शहरातील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(४) * ३९८९६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) शहरातील मुख्य बाजारपेठेतून जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली असुन प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे काम ठेकेदारानेही अपुर्णावस्थेत ठेवले असून केलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्ण व निष्कृष्ट कामामुळे बाजारपेठेतून जाणाऱ्या वाहनांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून व्यापारीही त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदरहू रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासून या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर व या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदरील रस्त्याचे काम दर्जेदार होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) गुहागर- विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ ई वरील जत शहरातील एक कि.मी. लांबीमध्ये कॉंक्रिट रस्ता व गटर पर्यंत पेव्हिंग ब्लॉकच्या बाजूपट्टीचे काम ऑगस्ट २०२१ मध्ये पूर्ण झाले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. तसेच या ठिकाणच्या २० मीटर लांबीतील गटरचे काम वगळता ९८० मीटर लांबीतील गटरचे काम पूर्ण झाले आहे.

सदरहू २० मीटर लांबीमध्ये कबर होती, त्यामुळे या ठिकाणच्या गटरचे काम प्रलंबित राहीले. परंतु सद्यस्थितीत कबरचे अतिक्रमण काढण्यात आले असून प्रलंबित गटरचे काम पोलीस संरक्षण घेवून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रलंबित २० मीटरचे बंदिस्त R.C.C. गटरचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कबरचे अतिक्रमण काढण्यात आले असून पुढील काम पूर्ण करणेसाठी पोलीस बंदोबस्तासाठी पोलीस अधीक्षक, सांगली यांना कळविण्यातआले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नवीन बांधकाम केलेल्या इमारतीचे सर्व देय कर विकासकाकडून वसूल करण्याबाबत

**(५) * ३९६४५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परळ येथील फ्लोरेन्स टॉवर, परळ भोईवाडा जेरबाई वाडीया येथील मातोश्री संस्थेसहीत सहा इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता कर, पाणीपट्टी, विद्युत देयक व इतर देय कर भरण्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाने नोटीस पाठविली आहे. तथापि, बांधकाम प्रकल्पाच्या कामात कोट्यवधी रुपयांची थकविलेली देयके वसूल करण्याबाबत संबंधित विकासकास नोटीस न पाठविता सोसायट्यांना नोटीस पाठविण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने पार्ट ओसी असलेल्या परंतु, अंतिम ओसी प्राप्त नसलेल्या नवीन इमारतीतील ग्राहक तथा रहिवाश्यांना पाणीपट्टी, मालमत्ता कर तसेच मलनि:सारण कर आदि अतिरिक्त कर खर्चाचा परतावा विकासकाने रहिवाश्यांना करणे आवश्यक असल्याचा महत्वपूर्ण आदेश दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात नवीन इमारतींचे बांधकाम करुन पार्ट ओसीच्या ताबा दिलेल्या परंतु, अंतिम ओसी (Final OC) प्राप्त नसलेल्या इमारतींची संख्या किती आहे तसेच इमारतींचा एकूण महापालिकेला देय असलेला किती कर थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे,
(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उक्त थकीत कर नवीन इमारतींच्या गृहनिर्माण संस्थेकडून न घेता विकासकाकडून वसूल करण्याच्या दृष्टीने शासन तथा महापालिकेतर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) लोअर परेल येथील फ्लोरेन्स टॉवर व परेल भोईवाडा जेरबाई वाडिया मातोश्री संस्था प्रकरणी विकासकांनी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंतचा इमारतीच्या बांधकामाखालील जमिनीचा माहे मार्च, २०२२ पर्यंतचा संपूर्ण मालमत्ता कर बृहन्मुंबई महानगरपालिकेस अधिदानित केलेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधकामाखालील जमिनीचा मालमत्ता कर वसुलीकरिता इमारतींमधील रहिवाशांकडे मागणी नोटीसा पाठविलेल्या नाहीत.
(२) दिनांक १२.०१.२०२२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या संकेतस्थळावर असा कोणताही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) दिनांक १५.०५.२०१५ पासून मुंबई शहर व उपनगरात अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या परंतु पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात न आलेल्या इमारतींची संख्या ७२८ इतकी आहे.

सदर ७२८ इमारतींपैकी २८१ इमारतींचा विकासकाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय असलेला रु.१०१८.१५ कोटी इतका मालमत्ता कर थकीत आहे.

(४) व (५) उक्त थकीत कर विकासकाकडून वसूल करण्याकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ ते २०६ नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत/आली आहे:-

- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०३ अन्वये, २६ मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई पूर्ण करण्यात आली असून सदर प्रकरणी रु.१६.५० कोटी रक्कम वसूल करावयाची आहे.
- मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक २५९२/२०१३ मधील अंतरिम आदेशानुसार अधिदानीत रक्कमेपश्चात उर्वरित रु.६७८.१७ कोटी इतक्या थकीत रकमेच्या १२२ प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६२ अन्वये, तक्रार दाखल केलेल्या व कलम १६५ अन्वये सुनावणी प्रक्रिया सुरु असलेल्या २६ प्रकरणांमध्ये रु.१४८.९३ कोटी रक्कम वसूल करावयाची आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या अन्वेषण अधिकाऱ्यांच्या सुनावणीअंती करदायित्व निश्चित झाल्यानंतर कर वसुलीची कार्यवाही करण्यात येणार आहे.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०२ अन्वये दंड आकारणी केलेल्या ७६ प्रकरणांमध्ये रु.१३०.४६ कोटी रक्कम वसूल करावयाची आहे.
- परताव्याच्या समायोजनाच्या ७ प्रकरणांमध्ये रु.१०.९४ कोटी रक्कम समायोजित करावयाची आहे.
- नवीन करनिर्धारण व पुनर्करनिर्धारणामुळे सुधारित झालेल्या रु. ३३.१५ कोटी रकमेच्या २४ प्रकरणांमध्ये मालमत्ता देयकांचे देय दिनांक उलटून जाईपर्यंत अधिदान न केल्यास, देय दिनांकानंतर वसुलीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## राज्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत करण्यात आलेल्या कामकाजांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ४३६९६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत करण्यात आलेल्या सर्वच कामकाजांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला असून यामध्ये जबाबदार असणाऱ्या संबंधीत दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यमंत्री, वने यांचे समवेत दिनांक २७ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीमध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बैठकीमध्ये मा.मंत्री महोदय यांनी राज्यातील संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कामकाजाची चौकशी समिती नेमून चौकशी करण्याचे निर्देश प्रधान सचिव, वने विभाग यांना दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी मा.राज्यमंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कोल्हापूर जिल्ह्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत करण्यात आलेल्या तपासणीचा चौकशी अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे पाठविण्याबाबत व त्याअनुषंगाने त्यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्याबाबत मा.राज्यमंत्री यांनी निर्देश दिले होते.

(३) प्रस्तुत प्रकरणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तपासणी अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर केला आहे. अहवालाच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संयुक्त वन

व्यवस्थापन समित्यांमार्फत केल्या जाणाऱ्या कामावर सनियंत्रण ठेवण्यासाठी तसेच समितीमार्फत होणारी कामे सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अभ्यास करुन पर्याय सूचविण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) येथे सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांना शस्त्र दाखवून निविदा व देयके मान्य केल्याबाबत

**(७) * ३८०६० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांनी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांना शस्त्र दाखवून बांधकामाच्या निविदा मान्य करण्याकरिता व देयकांवर स्वाक्षऱ्या करण्यासाठी धमक्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी, बीड यांना पत्राव्दारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदारापासून सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता, अधिकारी व कर्मचारी यांना संरक्षण मिळावे याकरीता केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती संरक्षणात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.
संबंधित कार्यकारी अभियंता यांनी स्वसंरक्षणासाठी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे अर्ज केला होता.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेवर प्रशासक नेमण्याबाबत

**(८) * ४३४५४ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेचा कार्यकाल दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी संपुष्टात आल्याने शासनाने नगरपरिषदेवर प्रशासक नेमले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपुर्ण मराठवाड्यातील अ, ब व क नगरपरिषदेवर प्रशासक म्हणून उपविभागीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली असतांना अंबाजोगाई ही 'ब' दर्जाची नगरपरिषद असून त्यावर प्रशासक व मुख्याधिकारी यांची जबाबदारी एकाच व्यक्तीवर देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत दोन वर्षापासुन अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये अनेक गैरव्यवहार निदर्शनास आलेले असून, या गैरव्यवहारासंदर्भात अनेक सुनावण्या जिल्हाधिकारी, बीड, विभागीय आयुक्त, औरंगाबाद तथा मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असून सदर सुनावण्या अंतिम निर्णयास आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी तत्कालीन अध्यक्ष व सध्याचे प्रशासक व मुख्याधिकारी श्री.अशोक साबळे यांची गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सध्याचे प्रशासक व मुख्याधिकारी श्री.अशोक साबळे यांच्यावर आरोप असतांना त्यांनाच या नगरपरिषदेचे प्रशासक नेमण्यात आल्याने, गैरव्यवहारासंदर्भात अनेक चौकशा सुरु असतांना संबंधित तक्रारीबाबतचे पुरावे नष्ट होण्याची साशंकता निर्माण झाल्याने मोठा गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, संपूर्ण मराठवाड्यात एक निर्णय आणि अंबाजोगाई नगरपरिषदेस प्रशासक नेमण्याबाबत वेगळा निर्णय झाल्याने प्रश्न निर्माण झाला असून, एकाच व्यक्तीस दोन्ही पदभार दिल्याने व विभागीय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत होणाऱ्या चौकशांचे निर्णय अंतिम टप्यात असल्याने पदाचा दुरुपयोग होऊ शकतो, त्यामुळे नगरपरिषद अंबाजोगाई येथील प्रशासक पदाचा कार्यभार अतिरिक्त जिल्हाधिकारी, अंबाजोगाई अथवा उपजिल्हाधिकारी,

अंबाजोगाई यापैकी एकाची प्रशासक म्हणून नेमणुक करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नगरपरिषद अंबाजोगाई, नगरसेवक श्री.शेख रहीम शेख रज्जाक व श्री.सरंग अरुण पुजारी यांनी मा.नगरविकास मंत्री व जिल्हाधिकारी, बीड यांच्येकडे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी व त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) मराठवाड्यातील सर्वच अ, ब, क नगरपरिषदेवर प्रशासक म्हणून उपविभागीय अधिकारी यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात असल्याची बाब खरी नाही.

नगरपरिषदांची मुदत संपताच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३१७(३) मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकाऱ्यांची, उपविभागीय अधिकारी / तहसीलदार / मुख्याधिकारी यांची नियुक्ती प्रशासक पदी करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यात देखील परळी-वैजनाथ, गेवराई या नगरपरिषदांमध्ये संबंधीत मुख्याधिकाऱ्यांचीच नियुक्ती प्रशासक या पदी करण्यात आली आहे.

(३) व (४) मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद, जि.बीड यांचेबाबत प्राप्त तक्रारींसंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेकडे चौकशी/ सुनावणीची कार्यवाही सुरू असल्याचे विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालयाने कळविले आहे. त्यामध्ये अद्याप शासनास अहवाल सादर केला नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

(५) व (६) मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद, जि.बीड यांचेबाबत प्राप्त तक्रारींसंदर्भात विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे यापूर्वीच चौकशी सुरू आहे व चौकशीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षानुसार मागणीसंदर्भात आवश्यक उचीत कार्यवाही करण्यात येईल.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघरमधील सिडकोच्या जमिनीवरील लाखो रुपयांच्या गवत कापणीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(९) * ४३९३३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील दुग्धविकास विभागाची जमीन सिडकोने जिल्हा मुख्यालयाच्या बदल्यात ताब्यात घेतली असून या ४०० एकर जमिनीवर चांगल्या प्रतीचे गवत उगवत असून या गवताचा लिलाव दरवर्षी निविदा प्रक्रिया राबवून केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ मध्ये ७ लाख २० हजार रुपये, सन २०१९-२० मध्ये ७ लाख ८५ हजार रुपयांच्या निविदा गवत खरेदीसाठी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२०-२१ या वर्षाची निविदा प्रसिध्द होण्याआधीच सदर भूखंडावरील गवत अज्ञातांनी अचानक कापून नेल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पालघरमधील सिडकोच्या जमिनीवरील लाखो रुपयांच्या गवत कापणीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत एका अधिकाऱ्याने सफाळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने गवत कापणी गैरव्यवहातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०२०-२१ या हंगामाकरीता पालघर येथील गवत विक्री संदर्भात स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दि.२२.०१.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्याने निविदा प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने विक्रीचे काम होऊ शकले नाही. तद्नंतर, सन २०२१-२२ या हंगामाकरिता पालघर व केळवे रोड करिता स्थानिक वृत्तपत्रात दिनांक ३.३.२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, निविदा प्रसिध्द

होण्यापुर्वीच केळवे येथील जमिनीवरील गवत अज्ञातांनी कापून नेल्याचे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे.

त्यासंदर्भात केळवे रोड येथील सिडकोच्या मालकी हक्कातील भुखंडावरील अनधिकृतपणे गवत कापणी केल्याबाबत सफाळे पोलीस ठाणे, ता.जि.पालघर येथे गुन्हा र. नं. १९/२०२२ भा.दं.वि.स.च्या कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## उस्मानाबाद येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ पासून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१०) * ४३५६० डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ पासून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून जागोजागी मोठे खड्डे पडल्यामुळे हा रस्ता तातडीने दुरुस्त करावा म्हणून स्थानिक ग्रामस्थांच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महत्वाच्या रस्त्याची निविदा अंतिम होऊनही ठेकेदाराने रस्त्याची दुरुस्ती केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे संबंधित कंत्राटदाराकडून तातडीने भरुन घेण्यात आलेले असून, रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(३) सदर रस्त्यावरील प्रगतीत असलेले काम जून, २०२२ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील चांदीबाई कॉलेजसमोर असलेला पादचारी पूल बांधण्याबाबत**

**(११) * ४०७९४ श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील उल्हासनगर-३ येथील चांदीबाई कॉलेज समोर पादचारी पूल असून या पूलावरुन रेल्वेने प्रवेश करणारे हजारो नोकरदार वर्ग आणि चांदीबाई कॉलेज मधील असंख्य विद्यार्थी व शिक्षक वर्ग प्रवास करीत असून अतिवृष्टी मुळे या पुलाची दुरवस्था झाली असून सदर पूल धोकादायक झाला असल्याने तातडीने नवीन बांधण्याबाबत नैसर्गिक आपत्ती व्यस्थापन योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधी तसेच आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत वर्षीच्या अतिवृष्टीमुळे या पुलाच्या दोन्ही बाजुला बांधण्यांत आलेले लोखंडी कठडे खराब झाले आहे व रस्ता देखील खचला आहे व मोठ-मोठे खड्डे पडले आहेत, त्यामुळे नागरिक, विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेची उत्पन्नाची मर्यादा असल्याने तसेच मालमत्ता कर हे एकच उत्पन्नाचे साधन असल्याने सदर पूल बांधण्यास सक्षम नसून याकरीता निधी उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नैसर्गिक आपत्ती योजनेतून निधी उपलब्ध करुन पादचारी पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) चांदीबाई कॉलेज येथील पूल पूर्णपणे तोडून नव्याने बांधणेकरिता नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन योजनेंतर्गत विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी व आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) महसूल व वन विभागाच्या दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये फक्त नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत करण्याची तरतूद असल्याचे मदत व पुनर्वसन विभागाने कळविले आहे.

-----------------

## शिवडी (मुंबई) येथील महानगरपालिका भूखंडावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(१२) * ३९६२९ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी (मुंबई) येथील महानगरपालिका शाळेजवळ, शिवडी क्रोसरोड येथील महानगरपालिकेने भूमापन क्र.४४७ हा भुखंड मनोरंजन मैदान व खेळाच्या मैदानासाठी आरक्षित केलेला असतांना श्री.शिराजुद्दीन मोहम्मद शेख याने व्यावसायिक वापराकरीता उक्त भूखंडावर १३ अनधिकृत गाळे बांधले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत गाळ्यांच्या बांधकामाबाबत स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्त परिमंडळ-२, परळ, मुंबई यांच्याकडे सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करावे व महानगरपालिकेने ज्या उद्दीष्टाने भूखंड राखीव ठेवला आहे तो मोकळा करावा अशी लेखी मागणी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१८ व ३० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणाऱ्या श्री.शिराजुद्दीन मोहम्मद शेख याला महानगरपालिका प्रशासनाकडून आर्थिक देवाण-घेवाणीतून संरक्षण मिळत

असून अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात येत नसल्याने याप्रकरणी मुंबई महापौर यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक घेण्यात येऊन बांधकामाची कायदेशीर चौकशी करुन निष्कासित करणे असा निर्णय झालेला असतांनाही अद्याप बांधकाम निष्कासित न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या लेखी मागणीच्या अनुषंगाने शिवडी, मुंबई येथील महानगरपालिका भूखंडावरील १३ अनधिकृत गाळे निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नगर भूमापन क्र.४४७, परळ-शिवडी डिव्हीजन या भूभागावरील केस क्र. ५८ येथे एकूण १००० चौरस यार्ड व १३८८ चौरस यार्ड क्षेत्रफळाचे दोन रिक्त भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखावर अनुक्रमे दिनांक २७.०६.१९४९ व दिनांक ०१.०७.१९५६ पासून श्री.अमृतलाल पोपटलाल ओझा यांच्या नावे नोंदविले होते. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या प्रचलित परिपत्रकानुसार सदर दोन्ही रिक्त भूभागाच्या भाडेपट्टीचे करारपत्र रद्द करण्यात आले आहे.

तद्नंतर सदर भूभागावरील गोदामांचे ताबेदार सिराजद्दीन मोहम्मद शेख, निलोफर सिराजद्दीन शेख, सलाउद्दीन शेख व त्यांचे इतर नातेवाईक यांचे विनंतीस अनुसरुन सदर रिक्त भूभागावरील १३ गोदामांचे ताबेदार यांचे नाव अभिलेखावर घेण्यास दिनांक २९.०५.२०१२ रोजी मंजुरी दिली होती. तथापि, प्राप्त शहर आराखड्यानुसार सदर १३ गोदामांचे ताबेदारांची नावे अभिलेखावर घेण्यास दिलेली मंजुरी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१.०८.२०१२ रोजी रद्द केली आहे.

सदर रिक्त भूभागावरील त्याच क्षेत्रफळाचे ४ गोदामे सन १९६१-६२ पूर्वीचे असून करपात्र ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे सिराजद्दीन शेख व इतर यांनी सदर गोदामे अभिलेखावर घेण्यास केलेल्या विनंतीस अनुसरुन सदर ४ गोदामे अभिलेखावर घेण्यास मंजुरी देण्यात आली.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ नुसार सदर भूभागाचे आरक्षण “निवासी वापर” असे दर्शविण्यात आले आहे.

(२) अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मा.महापौर महोदयांकडे बैठक घेण्यात आली.

सदर ४ गाळयांच्या बाबतीत सिराजुद्दीन मोहम्म्द शेख, निलोफर सिराजुद्दीन शेख व सलाउद्दीन शेख यांच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखात घेण्यात आलेली मंजुरी विविध त्रुटींमुळे दिनांक १२.०३.२०१९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रद्द करण्यात आली.

सदर कारवाईविरोधात पक्षकाराने मा.शहर व दिवाणी न्यायालयात क्र.४२१६/२०१९ अन्वये दावा दाखल केला होता. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणी भाडेपट्टी संपुष्टात आणण्यापूर्वी नियमानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १०५ बी अंतर्गत कारवाई राबविण्यात येईल अशा प्रकारचे हमीपत्र मा. न्यायालयात दाखल केल्यामुळे सदर दावा मा. शहर व दिवाणी न्यायालयामार्फत निकाली काढण्यात आला.

तद्नंतर पक्षकाराने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १०५ बी अंतर्गत सुरु असलेल्या कारवाईस स्थगिती मिळविण्याकरिता मा. शहर व दिवाणी न्यायालयात दावा क्र.१६४३/२०२१ मधील नोटीस ऑफ मोशन क्र.१८५५/२०२१ दाखल केले. तथापि मा.न्यायालयाने पक्षकाराची सदर विनंती नाकारली.

मा.शहर व दिवाणी न्यायालयाच्या सदर आदेशास पक्षकाराने मा. उच्च न्यायालयात क्रमांक ३११/२०२१, ३१२/२०२१ व ३१३/२०२१ अन्वये अपील व अंतरिम अर्ज क्रमांक २७१५/२०२१, २७१७/२०२१ व २७१८/२०२१ दाखल केला आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०५.१०.२०२१ रोजीच्या आदेशानुसार पुढील सुनावणीपर्यंत पक्षकाराविरोधात कारवाई करण्यास स्थगिती दिली आहे. मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण नागपूर येथील जम्बुदीप नाल्याच्या बांधकामाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१३) * ४२८१२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण नागपूर येथील अयोध्या नगर ते मानेवाडा रिंगरोड पर्यंत असलेल्या जम्बुदीप नाल्याच्या बांधकामाला सन २०१७ मध्ये महानगरपालिका नागपूर क्षेत्रात मुलभूत सोयी-सुविधा विकास योजनेअंतर्गत १३ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला असून, या निधी अंतर्गत नाल्याचे खोलीकरण व संरक्षण भिंत बांधकाम करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९०% निधी शासनाने उपलब्ध करून न दिल्याने संरक्षण भिंतीचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडे प्रलंबित असलेला उर्वरित निधी नाल्याच्या बांधकामाकरीता महानगरपालिकेस मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील "दक्षिण नागपूर प्रभाग क्र.६४, अयोध्यानगर ते मानेवाडा रिंग रोड, जम्बुदीप नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण व संरक्षण भिंत बांधकाम" या १३.५६ कोटीच्या कामास शासन निर्णय दिनांक ०२ जून, २०१८ अन्वये मान्यता देण्यात आली असून या कामासाठी रुपये १.०० कोटी निधी देखिल उपलब्ध करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकल्पातील काम सुरु असल्याने त्याचा त्रास नागरीकांना होऊ नये याबाबतची उपाययोजना महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

नाल्याच्या अपूर्ण कामामुळे नागरीकांच्या घरात पाणी शिरत असल्याची बाब निदर्शनास आली नसल्याचा अहवाल नागपूर, महानगरपालिकेने सादर केला आहे.

(३) व (४) या प्रस्तावाच्या अनुषंगाने उर्वरित निधीच्या बाबतीत अर्थसंकल्पीय निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधीनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## कुंभारी (जि.सोलापूर) येथील महादेव मंदिर परिसरातील उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानात लागलेल्या आगीबाबत

**(१४) * ४३१२२ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभारी (जि.सोलापूर) येथील महादेव मंदिर परिसरातील उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानात लागलेल्या आगीत स्थानिक प्रजातींच्या अनेक दुर्मिळ वृक्षांसह इतर अनेक वृक्षांना आग लागली असून पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन ही बाधित झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उद्यानातून गेलेल्या विद्युत वाहिन्यांमुळे दरवर्षी आगीच्या दुर्घटना घडत असल्याने, ग्रामपंचायतीने वारंवार मागणी करूनही विद्युत वाहिन्या उद्यानाच्या बाहेरून काढल्या जात नसल्याने अनेक वृक्षांचे आगीत जळून नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विद्युत वाहिन्या उद्यानाच्या बाहेरून नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर उद्यानातील विद्युत वाहिनी हलविण्याबाबत ग्रामपंचायत कुंभारी यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस कोणताही पत्रव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र, सोलापूर यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना दिनांक १९.१.२०१९, ३०.१.२०२०, २८.२.२०२०, ३.३.२०२० व १८.१२.२०२० अन्वये

विद्युत वाहिनी वनक्षेत्राच्या बाहेरून नेण्याचे अथवा अशा घटना घडणार नाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कळविले आहे.

(३) मौ. कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर येथील गट नं. ११४२/१ जमीन गायरान असून सदर जमिनीवर सामाजिक वनिकरण विभागामार्फत उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान तयार करण्यात आले आहे. सरपंच, ग्रामपंचायत कुंभारी व ग्राम विकास अधिकारी यांच्याकडे दिनांक ३.८.२०२१ रोजी सामाजिक वनिकरण विभागाने सदर उद्यानाचा ताबा दिला आहे. तथापि, सदर उद्यानाचा ताबा घेणेबाबत ग्रामपंचायतीचा ठराव पारित झालेला नाही. तसेच सामाजिक वनिकरण विभागाकडून सदर उद्यानाची मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी पंचायत समिती अथवा जिल्हा परिषदेकडे कोणताही प्रस्ताव महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५५ नुसार सादर केलेला नाही. सबब, सदर मालमत्तेचे हस्तांतरण प्रक्रीया नियमानुसार झालेली नाही.

सदर प्रकरणी उद्यानाचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे झालेले नसल्याने हस्तांतरणाबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर उद्यानात विद्युत तारांमुळे आग लागू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर यांना दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेने प्रदुषणकारी बीएस-४ मॉडेलच्या बसेस सुरु केल्याबाबत

**(१५) * ४०३३४ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीएस-४ मॉडेलच्या कार्बन उत्सर्जित करणाऱ्या वाहनांवर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशानूसार तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार बंदी घालण्यांत येऊन त्याऐवजी प्रदुषण कमी करणाऱ्या नवीन बीएस-६ मॉडेलच्या बसेस प्रवासाकरिता वापरात आणण्याच्या सूचना शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतांना नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरात एका खासगी कंपनीच्या ई-मेलचा आधार घेऊन त्याबाबतच्या अटी व शर्तीमध्ये आपल्या स्तरावर बदल करुन मा.सर्वोच्च न्यायालय, केंद्र शासन तसेच राज्य शासनाचे आदेश डावलून मागील वर्षापासून प्रदुषणकारी बीएस-४ मॉडेलच्या बसेस खरेदी करुन वापरात आणल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे मा.परिवहन आयुक्त, यांचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशान्वये, "कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ मार्च, २०२० नंतर बीएस-४ वाहनांची विक्री व नोंदणी करण्यास परवानगी न देण्याचे धोरण राबविण्यांत येणे" तर "दुसरीकडे नाशिक महानगरपालिकेमार्फत बीएस-४ नॉर्म्सच्या बसेस वापरात असल्या तरी यापुढे निविदा प्रक्रिया राबवून बसेस खरेदी करतांना बीएस-६ नॉर्म्सचे तपशिल वापरावे लागेल, असे शासनाने त्यांच्या दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीएस-४ नार्म्सऐवजी बीएस-६ नॉर्म्सच्या बसेस करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय तसेच केंद्र व राज्य शासनाचे आदेशानुसार कार्यवाही करावी, अशी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ मार्च, २०२० रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिका प्रशासनास कळविण्यात आले होते, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाचे आदेश डावलून प्रदुषणकारी असलेल्या बीएस-४ नॉर्म्सच्या बसेस खरेदी करणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द रकमेच्या वसुलीसह शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक विभागाच्या दिनांक ०६/०३/२०२० च्या पत्रानुसार, दि.०१/०४/२०२० नंतर बी.एस.-४ नॉर्म्सच्या वाहनांची नोंदणी किंवा विक्री होणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, दि.०१/०४/२०२० पूर्वी उत्पादित केलेले व नोंदणी झालेले बी.एस.-४ प्रकारची वाहने पुढील कालावधीत वापरासाठी अनुज्ञेय आहेत.

(२), (३) व (४) नाशिक शहर बससेवेसाठी महानगरपालिकेमार्फत दि.०१/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आलेल्या निविदेत बी.एस.-६ नॉर्म्सच्या बसेसचा समावेश होता. तथापि, सदर निविदेच्या दि.२०/०३/२०१९ रोजी झालेल्या प्रिबीड बैठकीत उपस्थित असलेल्या विविध बस उत्पादक कंपनी यांनी बी.एस.-६ बस उपलब्ध होण्याबाबत शंका उपस्थित केली.

बी.एस.-४ नॉर्मचे उत्पादन हे मार्च-२०२० पर्यंत चालू राहणार असल्याने मार्च-२०२० पर्यंत नोंदणी होणारे बी.एस.-४ नॉर्मचे वाहन पुढे वापरासाठी अनुज्ञेय असल्याने सर्व बस उत्पादकांचे उत्पादन हे बी.एस.-४ नॉर्म्सचेच करण्यात येत होते.

बी.एस.-६ नॉर्मस हे एप्रिल-२०२० पासून लागू होणार असून त्याबाबत अद्याप संशोधन प्रगतीत आहे. त्यामुळे कोणीही उत्पादक बी.एस.-६ या प्रकारच्या बसेसचा पुरवठा करत नसल्याने बीएस-६ चे दर उपलब्ध नव्हते.

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक विभागाच्या दिनांक ०६/०३/२०२० च्या पत्रानुसार, दि.०१/०४/२०२० नंतर बी.एस.-४ वाहनांची नोंदणी किंवा विक्री होणार नाही. मात्र दि.०१/०४/२०२० पूर्वी नोंदणी झालेली बी.एस.-४ वाहने पुढील कालावधीत वापरासाठी अनुज्ञेय आहेत.

बी.एस.-६ चे उत्पादन सुरु नसल्याने त्या कालावधीत भारतातील विविध शहरात बी.एस.-४ च्या निविदा काढण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, नाशिक महानगरपालिका स्थायी समितीने डिझेल बस-५० व सीएनजी बस-१५० च्या प्रस्तावास मान्यता दिली.

नाशिक महानगरपालिकेतील शहर बस सेवेसाठी निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात येऊन, दि.१०/०२/२०२० रोजी Ms.Travelltime Car Rental Pvt. Ltd. व M/s City LifelineTravels Pvt. Ltd. यांना कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१४/०३/२०२० च्या पत्रान्वये बीएस-६ मॉडेलच्या बसेस नाशिक शहरात सुरु करण्याबाबत विनंती केली होती.

त्याअनुषंगाने, सद्यस्थितीत नाशिक महानगरपालिकेमार्फत बी.एस.-४ नॉर्म्सच्या बसेस वापरण्यात येत असल्या तरी, यापुढे शहर बस सेवेसाठी निविदा प्रक्रिया राबवून बसेस खरेदी करतांना बी.एस.-६ नॉर्म्सचे तपशिल वापरावे लागेल असे आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दिनांक १२/०१/२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे.

(५) या प्रकरणी शासन आदेशाचे उल्लंघन झालेले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाडी-खडगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) या रस्त्याच्या बांधकामाचे रस्ता संरेखन झाले नसल्याबाबत

**(१६) * ४३६११ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडी-खडगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) या रस्त्यांच्या निर्माणासाठी केन्द्रीय मार्ग निधीतून मंजूरी व निधी प्रदान करण्यात आलेला असून लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांना लेखी निवेदन देवूनही अद्‌याप वाडी-खडगांव रस्ता बांधकामाचे रस्ता संरेखन (Road Alignment) झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाडी-खडगांव रस्ते बांधकामात रस्ता संरेखनानुसार (Road Alignment) रस्त्याचे व नाल्याचे बांधकाम झाले नसल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. सदर रस्त्याचे काम संरेखनानुसार झालेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-शिळफाटा-रांजनोली (जि.ठाणे) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(१७) * ३८६४० श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-शिळफाटा-रांजनोली गावापर्यंत २१ कि.मी. लांबीच्या मार्गावर वाहतूक कोंडी होवू नये म्हणून तसेच पुढील २० वर्षाच्या वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून रस्ते विकास

महामंडळाच्यामार्फत रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रिटीकरणाचे काम साकेत इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदाराकडून माहे जानेवारी, २०१९ पासून सुरू करण्यात आले असून ३६ महिन्यात ते पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र कोरोना महामारीमुळे या रस्त्याच्या कामास मुदतवाढ देण्यात आली असली तरी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे उद्‌दिष्ट ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी, संथगतीने सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्य नागरिकांकडून देखील शंका उपस्थित केली जात असून, काम पूर्ण झालेला रस्ता निष्कृष्ट दर्जाचा तसेच प्रत्येक लेन मध्ये असलेल्या गटर स्पेसमध्ये उंच-सखलपणा असल्याने हा रस्ता विशेषकरून दुचाकीस्वारांसाठी धोकादायक बनला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत अनेक वाहनचालकांना या रस्त्यावरील कामादरम्यान अपघाताला सामोरे जावे लागले आहे. तसेच रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनीच झालेल्या कामाची पाहणी केली असता, काम अनेक ठिकाणी अतिशय निकृष्ट झाल्याचे मान्य केले असून ४० ठिकाणी रस्ता वापरण्याजोगे नसल्याचा अभिप्राय नोंदविण्यात आल्यानंतर या ठिकाणी पुन्हा काँक्रिटीकरण करण्याचा (रिकास्ट) आदेश ठेकेदारांना देण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने शासनाने संबंधित ठेकेदाराविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्याचे क्राँकीटीकरणाने सहापदरी रुंदीकरण करण्याच्या कामासाठी मे. साकेत इन्फ्राप्राजेक्ट प्रा.लि जेव्ही मे.एस.एम.एस.एल. यांची नियुक्ती दिनांक ११.०३.२०२० रोजी केली असून सदर कंत्राटाचा कालावधी २४ महिने असून त्याची मुदत दिनांक १०.०३.२०२२ पर्यंत आहे.

मात्र कोरोना महामारीमुळे व इतर कारणांस्तव मे.साकेत इन्फ्राप्राजेक्ट प्रा.लि जेव्ही मे.एस.एम.एस.एल. ठेकेदार यांनी दिनांक १०.०२.२०२२ च्या पत्रान्वये मुदतवाढीसाठी अर्ज केला असून सदर काम पूर्ण करण्यासाठी १२

महिनेची म्हणजे दिनांक १०.०३.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव महामंडळात विचाराधीन आहे.

(२) सदर सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर महामंडळाने कामाच्या दर्जा तपासणीसाठी मे. वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI) यांची दिनांक १८.०१.२०२१ अन्वये नियुक्ती केली आहे.

कंत्राटदारामार्फत रोड साईड गटाराचे काम अद्याप पूर्ण करण्यात आले नसुन सदरचे काम याकामासाठी नियुक्त केलेल्या सल्लागाराच्या देखरेखेखाली प्रगतीपथावर आहे.

सदर रस्ता रुंदीकरणाचे काम या रस्त्यावर अपघात कमी करण्याच्या दृष्टीकोणातून व संकल्पनाप्रमाणे राबविण्यात येत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याच्या क्राँकीटीकरणाच्या कामाची गुणवत्ता व दर्जा तपासण्यासाठी तसेच केलेल्या कामाचे त्रयस्थ शासकीय संस्थेमार्फत ऑडीट करण्यासाठी नेमलेली मे.वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI) यांनी भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्याच्या क्राँकीटीकरणाच्या कामाच्या २१ कि.मी लांबीपैकी १० कि.मी लांबीचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट महामंडळास प्राप्त झालेला आहे. सदर ऑडीट रिपोर्टप्रमाणे १० कि.मी लांबीत एकूण सुमारे १३,३२० पॅनल बनविण्यात आले असुन ३० पॅनल बदली करावयाचे असून ६४ पॅनलमध्ये लहान तडे गेल्याचे आढळून आले आहेत व ते त्वरीत सुधारण्याची शिफारस VJTI यांनी केली आहे. त्यानुसार महामंडळाने पत्र क्र. ५२०८ दिनांक २०.०९.२०२१ अन्वये कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या असून ३० पॅनल पैकी १३ पॅनल कंत्राटदाराने बदली केले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) त्रयस्थ शासकीय संस्था मे.वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI) यांनी दिलेल्या ऑडीट रिपोर्टप्रमाणे सुधारणा करण्याबाबत केलेल्या शिफारसीनुसार महामंडळाने कंत्राटदारास सुचना दिल्या असून कंत्राटदारामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंब्रा (जि.ठाणे) येथील महानगरपालिकेच्या हद्दीतील खान कंपाऊंड मधील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(१८) * ३९८९४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे पुन्हा नव्याने मोठया प्रमाणावर सुरु झाली असून मुंब्रा येथील खान कंपाऊंड भागात ८ ते १० मजल्याच्या सुमारे १० हून अधिक अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक आठवडयाच्या कालावधीत एक एक स्लॅब टाकला जात असल्याची तक्रार ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या महासभेत करण्यात आली असून या अनधिकृत इमारती विनाविलंब निष्कासित करण्यात याव्यात तसेच या अनधिकृत बांधकामाची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरोधात तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने प्रशासनाने पर्यायाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करुन दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर नियमितपणे निष्कासनाची कारवाई सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, दिवा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील खान कंपाऊंड येथील अनधिकृत बांधकामावरील निष्कासनाच्या कार्यवाहीबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने दिनांक ०७.०३.२०२२ रोजी केलेल्या प्रत्यक्ष स्थळपाहणी अहवालानुसार खान कंपाऊंड येथे कोणतेही अनधिकृत बांधकाम आढळले नसल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

दरम्यान ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २०.०१.२०२२ रोजीच्या महासभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका स्तरावर दिनांक ३१.०१.२०२२ पासून अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार अनधिकृत बांधकाम धारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदी अन्वये कारवाई केली जात आहे. सदर कारवाई अंतर्गत आजमितीस ७२ अनधिकृत बांधकामावर कारवाई केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार अनधिकृत बांधकामावर नियमोचित कारवाई करण्यात येत आहे.

तसेच, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे अंतर्गत नगरविकास विभाग यांच्या दिनांक ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे तसेच अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रित / निर्मुलनासाठी महानगरपालिकेचे सर्व संबंधीत अधिकारी/ कर्मचारी आपले कर्तव्य व जबाबदारी पार पाडतील अशा सूचना तातडीने निर्गमित करण्याचे निर्देश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ शहरातील उद्यानांची देखभाल व दुरुस्ती करण्याकडे नगरपालिका दुर्लक्ष करीत असल्याबाबत

**(१९) *४३५१० श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड)**
सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपालिका क्षेत्रात नऊ उद्याने असून यामध्ये आझाद मैदानातील नेहरु उद्यान, शिवाजी उद्यान, अंबिकानगरातील बगीचा, वसंत उद्यान, विवेकानंद शाळेसमोरील मैदान यासह अनेक उद्यानांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यानांच्या देखभाल दुरुस्तीवर पुर्वी महिन्याला १ लाख ५९ हजार रुपयांचा खर्च केला जात होता तसेच सदर उद्यांनामध्ये आमदार निधी व वैशिष्टपूर्ण योजनेतून उद्यानांचे सौदर्यीकरण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) परंतु, सदर उद्यानांकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, गत दोन वर्षापासून शहरातील उद्यानांची देखभाल व दुरुस्ती केली जात नसल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उद्यानांच्या सौंदर्यीकरणावर कोटयवधी रुपये खर्च झाले असून सध्य:स्थितीत ही उद्याने छोटया छोटया तृणांनी तसेच झुडपांनी भरलेली दिसत असून उद्यानातील हिरवळ नष्ट झाली असल्याने सदरहू उद्यानामध्ये नागरिक जाण्याचे टाळत असून नगरपालिकेच्या या कारभारावर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर उद्यानाच्या देखभाल व दुरुस्तीची निविदा न काढण्याची कारणे काय आहेत व त्यानुसार उद्यानाच्या सुशोभिकरणासाठी व देखभालीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) यवतमाळ नगरपरिषद क्षेत्रात एकूण २१ उद्याने आहेत. त्यातील काही प्रमुख उद्यानांच्या नावाचा उल्लेख प्रश्न भाग-१ मध्ये करण्यात आला आहे.

(२) सन २०१८-२०१९ पर्यंत निविदा मागवून ठेकेदारामार्फत त्यावेळी असलेल्या ९ प्रमुख उद्यानांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत होती, हे खरे आहे.

त्याचप्रमाणे आमदार निधी व वैशिष्ट्यपूर्ण निधीतून उद्यानाचे सौंदर्यीकरण त्यानंतरच्या कालावधीत केले गेले, हे ही खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०१९-२०२० या वर्षामध्ये १५ उद्यानांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. तथापि, त्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मान्यतेसाठी सादर केल्या असता स्थायी समितीने सदर निविदा रद्द करुन फेरनिविदा काढण्याचे आदेश दिले.

सन २०२०-२०२१ मध्ये देखील १८ उद्यानाच्या देखभाल / दुरुस्तीसाठी सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात आला. दरम्यान त्यातील काही बगीच्यांच्या सौंदर्यीकरणाच्या कामाच्या तक्रारीची चौकशी उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांच्याकडून सुरु असल्याने चौकशी पूर्ण होईपर्यंत निविदा

प्रक्रिया न करण्याचा निर्णय बहुमताने घेण्यात आला. परिणामी त्याही वर्षी देखभाल व दुरुस्तीची निविदा मंजूर होवू शकली नाही.

सन २०२०-२०२१ साठी २० उद्यानांच्या देखभालीकरीता नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया राबविली असून दिनांक २२/०२/२०२२ रोजी निम्नतम दर असलेल्या ठेकेदाराला कार्यारंभ आदेश (Work Order) दिले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

-----------------

## मुंबईतील मालाड मालवणी येथील बुद्ध विहाराचा भाग निष्कसित न करता नालीचे बांधकाम करण्याबाबत

**(२०) * ४०९६० श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड मालवणीतील गेट क्र.६ येथे ३६ वर्ष जुने बौद्ध सांस्कृतिक केंद्र हे बुद्धविहार असून मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या नाले दुरुस्तीच्या कामासाठी या विहाराचा ४० टक्के भाग निष्कासित करण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बुद्ध विहाराला कोणतीही नोटीस महानगरपालिकेकडून अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसून, विहार परिसरातील उंच आणि डेरेदार अशा अंदाजे २० वृक्षांना महापालिकेने नोटीसा दिल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाले दुरुस्ती आणि बांधणीसाठी विहारालगतच्या झाडांना नोटीस दिली जाते मात्र विहाराबाबत महानगरपालिका किंवा सबंधित यंत्रणा नोटीस देत नाही याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर बुद्धविहार निष्कासित झाल्यास मालवणी येथील बौद्ध समाजामध्ये असंतोष पसरुन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू नालीचे बांधकाम बुद्ध विहाराचा भाग निष्कासित न करता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील मालाड मालवणी येथील गेट क्र. ६ येथे बुध्दविहार असून, सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नाला रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर नाले दुरुस्तीच्या कामासाठी या बुध्दविहाराचा ४०% भाग बाधीत होत आहे.

(२) व (३) सदर बुध्दविहाराला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २६.०२.२०२२ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या २० झाडांपैकी प्रस्तावित नाला बांधकामात व रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या एकूण १७ झाडांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नोटीस लावण्यात आली आहे. सदर १७ झाडांपैकी ८ झाडे कापणे व ९ झाडे पुनर्रोपित करणे याकरिता वृक्ष प्राधिकरणाच्या दिनांक १७.१२.२०२१ रोजीच्या मंजुरीनंतर झाडे काढण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर जागेवरील ८ झाडांपैकी ५ झाडे कापण्यात आली आहेत व पुनर्रोपित करण्यास परवानगी दिलेल्या एकूण ९ झाडांपैकी ४ झाडे पुनर्रोपित करण्यात आली आहेत.

(४), (५) व (६) सदर बुध्दविहाराची पुनर्बांधणी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास दिनांक १४.०३.२०२२ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर बुध्दविहाराच्या उर्ध्व व अध: भागामध्ये मालवणी नाल्याच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे.

सदर बुध्दविहार नाला रुंदीकरणात अंशत: बाधीत होत असल्यामुळे ते अंशत: निष्कासित/स्थलांतरीत केल्यानंतर तेथील नाला रुंदीकरणाचे काम करण्यात येणार आहे.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील लळिंग-सडगाव-अजनाळे या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२१) * ३९०७७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील लळिंग-सडगाव-अजनाळे या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा

लागत असल्याने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने रस्त्याची दुरुस्ती त्वरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय.

परिसरातील स्थानिक नागरिकांनी सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत सा.बां.विभागाकडे मागणी केलेली आहे हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील उल्हास नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत

**(२२) * ४३६७१ श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे जाण्यासाठी असलेला उल्हास नदीवरील पूल हा अरुंद व कालबाह्य झाल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पूल अरुंद असल्याने या ठिकाणाहून होणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हास नदीवर नवीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) उल्हास नदीवरील दगडी आर्च पुल ६० वर्षापुर्वी बांधण्यात आलेला आहे. या पुलाची रूंदी केवळ ७.०० मी. असल्याने वाहतुकीस पुल अपुरा पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि सद्यस्थितीत सदर पुलावरून सुरळीत वाहतुक सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) या पुलाच्या ठिकाणी ३०.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

विहीत प्रक्रिया पूर्ण करून दिनांक ०८.०३.२०१९ अन्वये नवीन पुल बांधणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता समंत्रकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

संमत्रक यांनी सविस्तर सर्व्हेक्षण, भुस्तर सर्व्हेक्षण, जल प्रवाह सर्वेक्षण इत्यादी कामे पूर्ण करून नवीन पुलाचे “सामान्य व्यवस्था नकाशे” (GAD) शहर अभियंत्याच्या मान्यतेसाठी सादर केले आहेत.

प्रस्तावित नवीन पुलाचे स्ट्रक्चरल डिझाईन आय.आय.टी. मुंबई अथवा व्हि.जे.टी.आय. या संस्थेमार्फत तपासून घेतल्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम करण्यात येणार आहे.

सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकात नवीन पुल बांधण्यासाठी रू.२० कोटीची तरतूद करण्यात आली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा नियोजन समितीने वनविभागातील विविध विकास कामांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(२३) * ४०७३४ श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा नियोजन समितीने सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात वनविभागातील विविध विकास कामांसाठी तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.राहूल रेखावार यांनी १० कोटी ८४ लाख रूपयांचा निधी वन विभागास दिला होता. सदरहू निधी संदर्भात तत्कालीन वन विभागीय अधिकारी व वनपरिक्षेत्र

अधिकारी बीड, यांनी कागदोपत्रीच काम दाखवून नातेवाईक, मित्र मंडळी यांच्या नावाने बनावट पावती बनवून संपूर्ण निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, श्री.शिवशंकर महादेव भोसले, जाणता राजा प्रतिष्ठान रणजित रामभाऊ सणसिंग, आदींनी जवळपास पाच तक्रारी विविध सामाजिक संघटना कार्यकर्ते यांनी पुराव्यासह जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी वन विभागाला चौकशीचे आदेश देऊन सविस्तर अहवाल पाठविण्याबाबत कळविलेले असतानाही वनविभाग अधिकारी कर्मचाऱ्यांच्या बचावासाठी चौकशी अहवाल जिल्हा नियोजन समितीला देत नसल्याने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी पुन्हा एकदा जिल्हा नियोजन समितीने स्मरणपत्र देऊन अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा नियोजन समितीतून वनविभागातील विविध कामांसाठी दिलेला १० कोटी ८४ लाख रूपये निधी ३१ मार्च २०२० नंतरचा अखर्चित निधी शासनास परत करणे बंधनकारक होते. परंतु श्री.मधुकर तेलंग, वनविभागीय अधिकारी, बीड यांनी, बीड तालुक्यातील करचुंडी, पाली तिप्पटवाडी, बेवखंडी पाटोदा, खडकीदेवळा तसेच वडवणा तालुक्यातील चिंचवण, पहडी पारगाव, धुकवड, धारूर तालुक्यातील आरणवाडी, माजलगाव तालुक्यातील मोहखेड, आष्टी तालुक्यातील धामनगाव, देवळाली तसेच परळी, अंबाजोगाई, पारोंदा तालुक्यातील विविध गावातील संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या संयुक्त (जेएफएस) बँक खात्यावर बेकायदेशीर निधी वळवला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन निर्णयानुसार स्थानिक लोकांनाच सहभागी करून काम करण्याचे आदेश असताना, तत्कालीन वन विभागीय अधिकारी, ५ वनपरिक्षेत्र अधिकारी, ७ वनपाल आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी संगनमतानेच बनावट मजूर दाखवून ३९ लाख रूपयांचा निधी हडप केल्याची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) हे अंशत: खरे आहे,

बीड जिल्हा नियोजन समितीने सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात वन विभागातील विविध विकास कामांसाठी १० कोटी ४१ लक्ष रुपयांचा निधी बीड वन विभागास दिला होता. सदर निधीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे ऑगस्ट, २०२० मध्ये व त्यानंतर तक्रारी केलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही,

उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडील दिनांक २६.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना सदर तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, बीड यांनी दिनांक ०४.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, बीड यांना अहवाल सादर केलेला आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २१.०१.२०२१ अन्वये सविस्तर अहवाल उप आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना सादर केला आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणी विभागीय वन अधिकारी (नियोजन), औरंगाबाद यांनी चौकशी करुन दिनांक २२.०४.२०२१ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद यांना अहवाल सादर केला आहे. तथापि, सन २०२०-२१ मध्ये वितरीत निधीबाबत पुनश्च: तक्रारी प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीने दिनांक १४.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये झालेल्या खर्चाचा कामनिहाय छायाचित्रांसह अहवाल सादर करण्याबाबत वन विभागास कळविले आहे. सदर अहवालही विभागीय वन अधिकारी, बीड यांनी जिल्हा नियोजन समितीला दिनांक १८.०१.२०२२ रोजी सादर केला आहे.

(३) हे खरे नाही.

बीड वन विभागास वनक्षेत्रातील मृद व जलसंधारणाची कामे या योजने अंतर्गत ४४०६-३०८१ या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त रु.१०.४१ कोटी निधीमधुन करण्यात येणाऱ्या कामांचा निधी सन २०१९-२० मध्ये दिनांक २०.०३.२०२० रोजी प्राप्त झाला होता. माहे मार्च-२०२० मध्ये विभागामार्फत रु.४.०५ कोटी एवढा निधी पुर्ण झालेल्या कामांवर विभागामार्फत खर्च झालेला असुन संयुक्त वन व्यवस्थापन समिती मार्फत प्रगतीपथावर असलेल्या कामांचा रु.६.३० कोटी एवढा

निधी बीड वन विभागांतर्गत येणाऱ्या १२ संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या खात्यावर विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८.११.२०१४ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जमा करण्यात आला होता. उर्वरित रु.०.०६ कोटी इतका निधी समर्पित करण्यात आला होता. संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेला रु.६.३० कोटी एवढा निधी माहे मार्च-२०२० नंतर समित्यांमार्फत कामे पुर्ण झाल्यानंतर खर्च करण्यात आला आहे.

(४) अशी तक्रार आहे, हे खरे आहे.

तथापि, याबाबत केलेल्या चौकशीत सदर तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसुन आले आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मुंबईतील जोगेश्वरी येथील आरे वसाहतीमधील आदिवासी पाडयांचे उपजिविकेच्या साधनांसह पुनर्वसन करण्याबाबत

**(२४) * ४२४०४ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील आरे वसाहतीमधील शासनाने जंगल म्हणून घोषित केलेल्या ८०० एकर जमीनीपैकी काही जागेत जवळपास २७ आदिवासी पाडे असून या आदिवासी पाडयातील आदिवासी नागरिक त्यांच्या जागेवर पिढयान पिढयापासून उपजीविकेसाठी शेती करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदरहू ८०० एकर जागा संपादित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे स्तरावर उक्त जमिनीचे सर्वेक्षणाचे काम सुरू असून, सदरहू सर्वेक्षणाचे काम करताना येथील आदिवासींना विश्वासात घेवून सर्वेक्षण करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र येथील आदिवासींना विश्वासात न घेता या आदिवासी नागरिकांच्या केवळ घरांचेच सर्वेक्षण करण्यात येत असून त्यांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या शेतजमिनीचे कोणतेही सर्वेक्षण करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जागेचे सर्वेक्षण करताना येथील आदिवासी पाडयांना गावठाणाचा दर्जा देवून त्यांच्या उपजीविकेच्या साधनांसह येथील आदिवासींचे पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने आदिवासी पाडयांना गावठाणाचा दर्जा देवून सदर जागेचे सर्वेक्षण करताना येथील आदिवासी नागरिकांचे त्यांच्या उपजीविकेच्या साधनांसह पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उद्धव ठाकरे :** (१), (२), (३) व (४) मौजे गोरेगाव पुर्व, मुंबई येथील आदिवासी पाडयांच्या पुनर्वसनाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

मौजे मरोशी, ता. बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर येथील वन विभागाच्या ताब्यातील ४०.४६९ हे.आर क्षेत्र तसेच मौजे आरे, गोरेगाव व मरोळ-मरोशी, ता. बोरीवली येथील २८६.७३२ हे.आर क्षेत्र असे एकूण ३२७.२०१ हे.आर क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून घोषीत करण्याचा मनोदय दिनांक १२.१०.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये जाहिर करण्यात आला आहे. उपरोक्त प्रमाणे नमूद ३२७.२०१ हे. आर क्षेत्रात कुठल्याही आदिवासी पाडयांचा समावेश नाही.

तथापि, उक्त जमीनीवरील किंवा त्यावर असलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या कथीत अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्याकरिता आणि त्या अधिकांराचे स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याकरिता भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ (क) अन्वये वन जमाबंदी अधिकारी म्हणून उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त क्षेत्राच्या वनजमाबंदी चौकशीअंती अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २० अंतर्गत अंतीम अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेतील पेठ क्रमांक ३२ वाल्हेकरवाडी येथील दवाखाना व व्यायाम शाळेची इमारत बांधण्याबाबत

**(२५) * ४०६७४ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड)** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील (जि.पुणे) पेठ क्रमांक ३२ वाल्हेकरवाडी येथील दवाखाना व व्यायाम शाळेची सन १९८४ मध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाल्हेकरवाडी दवाखाना इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट नकारात्मक आले असतानाही सदर ठिकाणी मानवी वसतिकरिता धोकादायक व असुरक्षित असलेल्या इमारतीमध्ये महानगरपालिकेचा दवाखाना व व्यायाम शाळा सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील साडेपाच वर्षापासून सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये सदर इमारतीची अंतर्गत संरचना धोकादायक स्थितीत असल्याचा अहवाल आल्यानंतरही महानगरपालिकेच्यावतीने लाखो रुपयांचा खर्च डागडुजी, दुरुस्ती तसेच रंगरंगोटीच्या कामासाठी केला आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या सदर वाल्हेकरवाडी पेठ क्रमांक ३२ येथील दवाखाना व व्यायाम शाळेची इमारत तातडीने पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट नकारात्मक आले आहे. सदरची इमारत ही तत्कालीन IS-४५६ नुसार बनविण्यात आली होती व स्ट्रक्चरल ऑडिट करताना सन २०१६ साली BIS-४५६ नुसार करण्यात आले. याबाबत वरिष्ठ स्ट्रक्चरल ऑडिटर बरोबर परत स्ट्रक्चरल ऑडिट संदर्भातील NDT चाचण्या घेण्यात आल्या त्यामध्ये इमारत वापरण्याजोगी असून काही दुरुस्त्या आवश्यक असल्याबाबत निदर्शनास आल्याचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने म्हटले आहे.

दवाखाना व व्यायाम शाळेची इमारत हलविणेकरीता सदर भागात महानगरपालिकेच्या मालकीची कुठलीही मालमत्ता उपलब्ध नाही. तसेच कोविड-१९ च्या महामारीत दवाखान्याचे बाह्य रुग्ण विभाग बंद करणे शक्य नसल्याने त्या दवाखान्यात तातपुरत्या स्वरुपातील दुरुस्त्या महानगरपालिकेतर्फे करुन देण्यात आल्या होत्या.

(४) व (५) याबाबत महानगरपालिकेने कळविले आहे की, दवाखाना व व्यायाम शाळेची इमारत हलविणेकरीता सदर भागात महानगरपालिकेच्या मालकीची कुठलीही मालमत्ता उपलब्ध नाही. त्यामुळे वाल्हेकरवाडी पेठ क्रमांक ३२ येथील दवाखाना व व्यायामशाळा हलविणेसाठी महानगरपालिकेच्या भूमी जिंदगी विभागामार्फत भाडेतत्वावर जागा घेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

-----------------

## मौजे तेर, (ता.जि.उस्मानाबाद) येथील पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(२६) * ३९१६४ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तेर (ता.जि.उस्मानाबाद) येथील पुलाची उंची कमी असल्याने माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमध्ये तेर गावात व पेठ भागात पाणी शिरुन तेथील स्थानिक नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणची शासनाने पहाणी केली आहे काय, पहाणीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने मौजे तेर येथील पेठ भागातील पुलाची उंची वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

अतिवृष्टीमुळे व निम्न तेरणा प्रकल्पातील पाणी सोडण्यात आल्याने विसर्गाचे पाणी मोठ्या प्रमाणात सेतू पुलावरुन वाहून, नदीपात्रातील पाणी गावामध्ये शिरले होते.
(२) व (३) होय हे खरे आहे.

सेतु पुलाच्या वरच्या भागात निम्न तेरणा प्रकल्प असून सदर प्रकल्पातून पाणी सोडल्यानंतर सदर सेतू पुलावरुन पाणी वाहते.

प्रश्नांकित पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सागरी महामार्गावरील दांडे-अणसुरे पुलाची झालेली दुरवस्था

**(२७) * ४३४८३ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सागरी महामार्गावरील दांडे-अणसुरे पुलाची अत्यंत दुरवस्था झाली असून पूल धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाला जोडलेल्या रस्त्याचा काही भाग खचला असून रस्ता आणि पुल यांना जोडणाऱ्या खांबालाही भेगा पडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची तातडीने दुरुस्ती न केल्यास महाड मधील सावित्री नदीवरील पुलाच्या घडलेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती याठिकाणी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पुलाच्या दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी होत असून या पुलाच्या दुरुस्तीकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, दांडे-अणसुरे पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर पुलाच्या अणुसरे बाजुकडील बॉक्स सेलच्या एका भिंतीला व राफ्ट स्लॅबला तडे गेले आहेत व रिर्टन खचले आहे. तथापि, मुख्य पुल सुस्थितीत आहे.
(३) सदर पुलावरील अवजड वाहतुक बंद केली असून पुलाच्या दोन्ही बाजूस आवश्यक ते माहिती फलक बसविण्यात आले आहे.
(४) व (५) सदर पुलाच्या दुरुस्तीकरीता मंजुर कामाची तांत्रिक मंजुरी व निविदा निश्चिती नंतर पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील नगरपालिकेच्या पथदिव्यांचा विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(२८) * ३९९९० श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील नगरपालिकेच्या पथदिव्यांच्या थकबाकीपोटी पालिकेकडे महावितरणचे जवळपास २२ लाख रुपये प्रलंबित असल्याने महावितरणने पथदिव्यांचा विद्युत पुरवठा खंडित केला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्युत पुरवठा खंडित केल्याने रात्री अंधाराचा फायदा घेऊन चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी थकबाकीपोटी असलेली रक्कम तातडीने महावितरणला अदा करुन पथदिवे पुर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) पोलीस निरिक्षक, गंगापूर पोलीस ठाणे, गंगापूर यांच्या अहवालानुसार विद्युत पुरवठा खंडित केल्याच्या दि.२० जानेवारी, २०२२ ते दि.२४ जानेवारी, २०२२ या कालावधीत गंगापूर नगरपरिषद हद्दीमध्ये एकही चोरीची घटना घडलेली नाही. तसेच सदर परिसरात चोरीबाबत गंगापूर पोलीस ठाणे येथे एकही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) पथदिव्यांचा खंडित विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यासाठी थकीत देयकाच्या रकमेपैकी रु.७,०६,१९८/- इतकी रक्कम महावितरण कार्यालयास अदा करण्यात आली असून, महावितरण कार्यालयाने दि.२५ जानेवारी, २०२२ रोजी पथदिव्यांचा विद्युत पुरवठा  पुर्ववत केला आहे.

उर्वरित थकीत देयकाची रक्कम भरण्याबाबतची कार्यवाही गंगापूर नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेमधील स्मार्ट सिटी योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२९) * ४४००५ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत येणारा “इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम” (ITS) हा प्रकल्प गेली पाच वर्षे केवळ कागदोपत्रीच असून या प्रकल्पांतर्गत कोणतीही कामे झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कामे झालेली नसताना संबंधित ठेकेदाराला दंड आकारण्याऐवजी ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पासाठी ठेकेदाराला २ कोटी ६५ लाख रुपयांची देयके अदा केली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मार्ट सिटी मिशन, नवी दिल्लीच्या संचालकांकडून एकूणच ठाणे स्मार्ट सिटीतील गैरव्यवहारांची चौकशी करून २७ जानेवारी, २०२२ पर्यंत अहवाल देण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेत गैरव्यवहार करणाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिकेमार्फत “इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम” या प्रकल्पासाठी मे. केपीएमजी या संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार आयटीएस प्रकल्पांतर्गत ठाणे परिवहन सेवेच्या ३४५ बसगाड्यांवर जीपीएस व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून, प्रवाशांसाठी “व्हेअर इज माय टीएमटी बस” हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आलेले आहे. १२ पीएसआय डिस्प्ले व १० एलईडी पॅनलची स्थापना करण्यात आली असून सुमारे ७०० हून अधिक वाहक, चालक व इतर अधिकारी वर्ग यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(२) निविदेच्या अटीं व शर्तीप्रमाणे एकूण ८ टप्प्यांपैकी पहिल्या ४ टप्प्यांचे काम सुरुवातीच्या काळात विहीत मुदतीत पूर्ण केल्याने त्या कामांच्या टप्प्यांनुसार ठेकेदारास रु. २,६५,००,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

पुढील टप्प्यातील उर्वरीत काम करताना होणाऱ्या विलंबापोटी कंत्राटदारास नियमानुसार दंड आकारण्याची दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी ठाणे स्मार्ट सिटीकडून नोटीस देण्यात आलेली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आले आहे.

(३), (४) व (५) या संदर्भात मा.विधानसभा सदस्य व इतर यांच्या तक्रारीस अनुसरुन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडून सविस्तर खुलासा

मागविण्यात आला असून त्यांचेकडून दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी खुलासा शासनाकडे प्राप्त झाला आहे. सदर खुलाशास अनुसरुन शासन स्तरावरील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील विविध शासकीय कार्यालयाच्या इमारतींची झालेली दुरवस्था

**(३०) * ४३५२४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील विविध शासकीय कार्यालयाच्या इमारती जुन्या व मोडकळीस आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतींपैकी काही इमारतींच्या बांधकामाला १०० वर्षांहून अधिक काळ लोटला असल्यामुळे इमारतीच्या छपरावर ताडपत्रीचे आवरण देवून वारंवार दुरुस्ती करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी कर्मचारी जीवमुठीत घेऊन आपले काम करीत असल्यामुळे उक्त इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत वा नवीन इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

वाडा (जि.पालघर) येथील विविध शासकीय कार्यालयाच्या इमारतींपैकी प्रामुख्याने पोलिस स्टेशन, वाडा व तहसिल कार्यालय, वाडा ही कार्यालये जुन्या दगडी बांधकामाच्या कौलारु इमारतीत आहेत. पावसाळयातील अतिवृष्टीमुळे कौलारु छपरातून पाण्याची गळती आढळून येते.

(३) जागेच्या उपलब्धते अभावी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम शक्य झालेले नाही. सद्यस्थितीत या इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी प्राप्त असून आवश्यक ती दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असून त्वरीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड सिटी गृहप्रकल्प परिसरातील (जि.पुणे) रिदम गेट सर्व्हे नं.७६/१ मध्ये विकासकाने बेकायदेशीररित्या केलेली वृक्षतोड

**(३१) * ४०५१७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील नांदेड सिटी गृहप्रकल्प परिसरातील रिदम गेट जवळ सर्व्हे नं.७६/१ मध्ये विकासकाने बेकायदेशीररित्या वृक्षतोड केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी विकासकाने महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता हजारो वृक्ष बेकायदेशीरपणे तोडले असून, याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वृक्षतोड झाल्याच्या छायाचित्रांसह निवेदन प्राप्त झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) स. नं. ७६/१ या क्षेत्रामध्ये वृक्षतोड झालेली नाही. तथापि, सदर सर्वे नंबरच्या नजिक असलेल्या सर्वे नं.५६/१ मध्ये अवैध वृक्षतोड झालेली आहे, हे खरे आहे.

नांदेड सिटी गृहप्रकल्प परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ कॅनॉल नजिकच्या ठिकाणी अवैधरित्या वृक्षतोड झाली असल्याबाबत दिनांक १४/०२/२०२२ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे.

तसेच स्थानिक वृत्त पत्रामध्ये याबाबत बातमी आलेली होती.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले आहे, हे खरे आहे.

(३) या प्रकरणी पुणे महानगरपालिके मार्फत दिनांक २२/०२/२०२२ रोजी तपासणी करण्यात आलेली असून, चौकशीमध्ये खालील बाबी आढळून आल्या :-

- अवैध वृक्षतोडीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांमार्फत स्थळ पाहणी करण्यात आली.
- स्थळ पाहणीत नांदेड सिटी परिसरातील सर्वे नं. ७६/१, येथे अवैध वृक्षतोड झाल्याचे आढळून आले नाही.
- तथापि, सदर परिसरातील सर्वे नं. ५६/१ येथे सुमारे १६ वृक्षांची अवैधरित्या तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- या प्रकरणी जागेवरील विकसन प्रकल्पाचे सिक्युरिटी ऑफिसर यांनी श्री. अमित वाल्हेकर व इतर यांच्या विरुद्ध संबंधित पोलीस स्टेशनला एन.सी.आर. दाखल केला आहे.
- याशिवाय श्री.अमित वाल्हेकर व इतर तसेच संचालक, मे.नांदेड सिटी डेव्हलपर्स अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लि., यांना पुणे महानगरपालिकेमार्फत विनापरवाना वृक्षतोडीबाबत खुलासा सादर करण्याच्या अनुषंगाने नोटीस देण्यात आलेली आहे.
- प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याचे निदेश आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयातील महामार्गाच्या कामात झालेली अनियमितता

**(३२) * ४३६६७ श्री.राजू कारेमोरे (तुमसर)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील मनसर-रामटेक व्हायाखापा-तिरोडा या राष्ट्रीय महामार्ग (नॅशनल हायवे) क्रमांक ७५३ च्या महामार्गाचे काम सुरु असून जवळपास ८० टक्के रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सदर महामार्गाच्या कडेला २० गावांची लोकवस्ती आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचे करण्यात येत असलेले बांधकाम हे यापूर्वीच्या रस्त्याच्या तुलनेत ८ ते १० फूट उंचस्तरावर करण्यात आल्यामुळे शेती, गावातील रस्ते, नाल्या, शेताकडे जाणारे रस्ते, ॲप्रोच रोड तसेच गावाला जोडणारे रस्ते निकामी झाल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावाजवळील प्रवासी निवारे, नाल्या व पथदिवे याबाबत कोणत्याही सोयी-सुविधांची व्यवस्था नसल्याचे तसेच सिमेंट रस्त्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले असून रस्त्याला भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याच्या कामांत संबंधित कंत्राटदार व शासकीय अधिकारी यांनी मोठया प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या असून त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशतः खरे आहे.
सदर महामार्गाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून महामार्गाच्या कडेला १५ गावांची लोकवस्ती आहे.
(२) सदर राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला असलेल्या गावाकडील रस्ते व अप्रोच रोड हे करारनाम्याच्या तरतुदीनुसार व IRC मानकानुसार तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर ठिकाणच्या सिमेंट रस्ता बांधकामाची उंची लगतच्या जमिनीच्या पातळीपेक्षा सुमारे चार ते पाच फूट उंच आहे व जेथे तांत्रीकदृष्टया रस्त्याची grade व profile मिळविणे आवश्यक होते अशा काही ठिकाणी आठ ते दहा फूट उंच आहे.

तसेच नाल्यांकडे व शेतांकडे जाणा-या रस्त्यावर आवश्यकतेप्रमाणे पोचमार्ग तयार करुन देण्यात आले असून कंत्राटामधील तरतुदीचे ठिकाणी काँक्रिट नालीचे बांधकाम करण्यात आले आहे. याखेरीज आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे ९०० मी.मी.व्यासाचे पाईप टाकून शेतकऱ्यांसाठी पोचमार्गाचे बांधकाम करण्यात आले

आहे. त्यामुळे प्रश्नांकित नमूद रस्ते व नाल्या निकामी झाले आहेत, ही बाब खरी नाही.

(३) प्रकल्पाच्या मंजूर वावानुसार गावाजवळील प्रवासी निवारे, पावसाळी नाल्या व पथदिवे इ.बांधकामे पूर्ण करण्यांत आली आहेत.

तसेच सदर राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा दर्जा निकषानुसार असल्याची खात्री प्राधिकृत अभियंता यांचेमार्फत करण्यात येत आहे. तथापी सदर महामार्गाच्या तुरळक ठिकाणी भेगा पडल्याची बाब खरी आहे. परंतु भेगा पडलेल्या ठिकाणची कंत्राटदारामार्फत त्यांच्या खर्चाने पॅनेल काढून नव्याने बांधकाम तसेच आवश्यक दुरुस्ती करण्यांत येत आहे.

(४) मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३.०९.२०२१ च्या पत्रान्वये अशा आशयाच्या तक्रारीचे निवेदन दिले होते, हे खरे आहे.

(५) अनु.क्र.२ व ३ च्या उत्तरामध्ये नमूद करण्यात आल्यानुसार कार्यवाही करण्यात येतआहे.

तसेच प्रस्तुत कामाच्या अनुषंगाने दिनांक १२.१०.२०२१ रोजी मा.राज्यमंत्री महोदय, सा.बां.(सार्वजनिक उपक्रम वगळून) यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित लोकप्रतिनिधींसमवेत बैठक होऊन त्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गृहप्रकल्पातील दुर्बल घटकांसाठी राखीव असलेली घरे नियमबाह्य विक्री करुन ठाणे येथील विकासकाने केलेला आर्थिक गैरव्यवहार

**(३३) * ३९६५१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा अधिनियमानुसार बांधकाम प्रकल्पातील ४ हजार चौरस मिटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या प्रकल्पातील आर्थिक दुर्लब घटकांसाठी २० टक्के राखीव ठेवण्यात आलेली प्लॅटिनम हेरिटेज प्रकल्पातील ३१ घरे ठाणे येथील श्री.दर्शन सागर नावाच्या विकासकाने कोकण मंडळाला (म्हाडाला) न देता परस्पर विक्री करुन म्हाडा नियमाचा भंग करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी विकासकांवर कारवाई करुन त्याने परस्पर विक्री केलेली २० टक्के राखीव घरांचे हस्तांतरण व्यवहार रद्द करुन सदरहू घरे म्हाडाच्या ताब्यात देण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, वसई, विरार, कल्याण, डोंबिवली आणि नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व कोकण मंडळातील अद्यापपर्यंत, किती विकासकांनी २० टक्के राखीव कोट्याअंतर्गत घरे म्हाडाच्या ताब्यात न देता अधिनियमांचे उल्लंघन करुन विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास सदरहू संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) हे खरे आहे.

(२) याप्रकरणी कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी ठाणे महानगरपालिकेला दिनांक १६/१२/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. त्याआधारे ठाणे महानगरपालिकेने संबंधित विकासकांविरुध्द कासारवडवली, ठाणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तसेच, सदर प्रकरणी गृहनिर्माण विभागामार्फ़त सखोल चौकशी करण्यात येत आहे .

(३) असे निदर्शनास आले नसल्याचे म्हाडाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भाडेतत्वावरील उभारण्यात आलेल्या सदनिकेच्या वाटपात केलेला गैरव्यवहार**

**(३४) * ३८६४१ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) भाडेतत्वावरील योजनेअंतर्गत सदनिकांची उभारणी केली असून या सदनिका मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पालिकेकडे वर्ग केल्यानंतर दिवा येथील भाडेतत्त्वावरील योजनेतील सदनिकांच्या वाटपात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बनावट दस्ताऐवज, ताबा पावती तसेच बायोमेट्रीक सर्व्हे या आधारे हा गैरव्यवहार झाला असून, या प्रकरणात ठाणे महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचा संशय असल्याने याचा शोध घेण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात येऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आठवडाभरात निर्णय घेतला नाही तर महानगरपालिकेसमोर बेमुदत उपोषण/आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशाराही ठाणे महानगरपालिकेला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित प्रकरणातील दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) भाडेतत्वावरील योजनेअंतर्गत सदनिकाची उभारणी केली असुन, सदर सदनिका ठाणे महानगरपालिकेकडून धोकादायक इमारत बाधित / प्रकल्प, रस्ता रुंदीकरण बाधित यांना तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतात.

सदर प्रकरणी मुंब्रा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता. तद्नंतर, विरोधी पक्षनेता, ठाणे महानगरपालिका यांनी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना पत्र दिले. सदर पत्रात त्यांनी याप्रकरणी महापौर, पदाधिकारी व आयुक्त यांची एक चौकशी समिती गठीत करावी व सदर समितीचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेसमोर सादर करावा. तसेच येत्या आठ दिवसांत चौकशी समिती गठीत न केल्यास महापालिका भवनासमोर बेमुदत आंदोलन करणार असल्याची बाब पत्रात नमुद केली होती.

तसेच मुंब्रा पोलिसांच्या तपासात सदरहु आरोपीकडून बनावट दस्तऐवज, ताबापावती प्राप्त झाली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर गुन्हयाबाबत मुंब्रा पोलिसांमार्फत एस.आय.टी स्थापन करण्यात आली असून, सदर एस.आय.टी मार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथे कलमठ-तरंदळे-भरणी या मुख्य रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३५) * ४३३६९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथे कलमठ-तरंदळे-भरणी या मुख्य रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडून संपूर्ण रस्ते खड्डेमय झाले असून डांबर उखडल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून वाहनचालकांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे सातत्याने होणारे अपघात व त्यामुळे होणारी मनुष्यहानी व वित्तहानी याबाबत गांभीर्याने विचार करुन अनेक गावच्या ग्रामस्थांनी सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी गेल्या ५ वर्षांपासून सातत्याने निवेदने देऊन व आंदोलने करुन पाठपुरावा केल्यामुळे सदर रस्त्याच्या पुनर्बांधणीच्या कामाची दोन वर्षांपूर्वी निविदा कार्यारंभ आदेश काढण्यात आले असून सुध्दा कामास सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामात होत असलेला विलंब व रस्ता दिवसेंदिवस वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाल्याने सदर रस्त्याच्या पुनर्बांधणीची तक्रार करुनही ४ दिवसांत काम सुरु झाले नसल्यास रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल अशा इशाऱ्याचे एक सविस्तर निवेदन श्री.मिलिंद मेस्त्री व अन्य ग्रामस्थांनी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली यांना पुन्हा सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कलमठ-तरंदळे-भरणी या मुख्य रस्त्याच्या पुनर्बांधणीचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही. या कामाचे कार्यारंभ आदेश माहे जून, २०२१ मध्ये देण्यात आलेले असून सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

(२) या विषयाबाबत ग्रामपंचायत कलमठ, ता.कणकवली यांचे दिनांक २१/०१/२०२२ चे पत्र प्राप्त आहे.

(३) सदरचे काम जून २०२२ पर्यंत पुर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत होत असलेल्या रस्त्यांच्या कामाबाबत

**(३६) * ४३५१६ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत जवळपास ११७५ कोटी रुपयांची सहा कामे सुरु असून त्यामध्ये दारव्हा-नेर, कुपटा, महागाव तालुक्यातील खडका, गुंज रस्ता तर पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी रस्त्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांना सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्याचे आदेश देण्यात आले असून सदर रस्त्यांची कामे दोन वर्षात पूर्ण करायची होती परंतु मार्च महिन्यात मुदत संपली तरी कामे पूर्ण झाली नाहीत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहनधारकांना होणारा त्रास व रस्त्यांवर होणाऱ्या अपघाताच्या घटनांची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांनी पाहणी करुन कंत्राटदार ईगल कंपनीला रस्त्यांची कामे तात्काळ मार्गी लावण्याबाबत आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्यांवरील खडड्यांमुळे अनेकांचे बळी जात असून अपघातात लाडखेड येथील एका महिलेचा मृत्यू झाल्याने स्थानिक लोकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून संबधित कंत्राटदारासह अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी स्थानिक लोकांकडून मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रस्त्याचे काम तातडीने करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कामाच्या भौतिक प्रगतीवर परिणाम झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सदर अपघात वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला असुन संबंधीत कंत्राटदारावर व अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत काम प्रगतीपथावर असून नोव्हेंबर-२०२२ पर्यंत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबई व उपनगरातील रात्रशाळांच्या समस्यांबाबत

**(३७) * ४११५६ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरात १८६ रात्रशाळा कार्यरत असून यातील जवळपास ९० रात्रशाळा मुंबई महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये भरत असून उर्वरित रात्रशाळा भाड्याच्या इमारतींमध्ये भरत आहेत परंतु सन २००४ पासून वेतनेतर अनुदान या शाळांना बंद झाल्याने या शाळांसमोर आर्थिक समस्या निर्माण झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रात्रशाळांमधून शिकलेले दोन विद्यार्थी राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले असुन अनेक जण उच्च पदावर कार्यरत असतानाही या रात्रशाळा नोकर भरती, पोषक आहार तसेच शिष्यवृत्ती आदी महत्त्वाच्या योजनांच्या लाभापासून अद्याप वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांची गरज ओळखून रात्र कनिष्ठ महाविद्यालये व रात्र महाविद्यालये ही रात्र शाळांना जोडून सुरू करून रात्रीचे शिक्षण घेण्याची संधी गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे जीवनच बदलून टाकत असताना या शाळांना वंचित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, रात्रशाळांच्या समस्या सोडविण्यासाठी पूर्णवेळ कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करणे, शिक्षकेतर व सर्व रिक्त पदे भरणे, वेतनेतर अनुदान देणे, भाडे माफ करणे आणि इतर मुलभूत सोयीसुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

खाजगी संस्थाच्या शाळांना शासन निर्णय दिनांक १९ जानेवारी, २०१३ अन्वये वेतनेत्तर अनुदान देण्यात येते. त्यात इमारत भाडे व दुरुस्ती समाविष्ट आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचना नूसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अनुदानित शाळेतील इ १ ते ८ वी मधील विद्यार्थ्याकरीता शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार या शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना लागू आहे.

चालू शैक्षणिक वर्षात शासन निर्णय, दिनांक ३ सप्टेंबर, २०२१ व दिनांक २ नोव्हेंबर, २०२१ अन्वये वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

तसेच, रात्र शाळेबाबत परीपूर्ण धोरण निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दि.१७/०१/२०२२ अन्वये समिती गठित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांचे मुद्रांक शुल्क न भरता केलेली फसवणूक

**(३८) * ४१९८७ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इमारत किंवा निवासी प्रकल्प उभा करताना भरावयाच्या प्रीमियम शुल्कात सवलत देऊन त्या मोबदल्यात ग्राहकांचे मुद्रांक शुल्क स्वतः भरण्याची ग्वाही देऊनही त्याचा बोजा ग्राहकांवर टाकून बांधकाम व्यवसायिकांनी ग्राहकांची तीन हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप मुंबई ग्राहक पंचायतने करुन या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी महारेरा (महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण) यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी प्रकल्प भरताना मुक्त मोबदला (फांजिबल) चटईक्षेत्र निर्देशकांसाठी बांधकाम व्यवसायिकांना प्रीमियम शुल्क (अधिमूल्य) भरावे लागते. या शुल्कात सन २०१९ मध्ये राज्य सरकारकडून २५ टक्के सवलत देण्यात आली. त्यानंतर फेब्रुवारी २०२१ मध्ये या निर्णयाला वर्षभराची मुदतवाढ देत सवलत ५० टक्के केली. मात्र या सवलतीचा लाभ घेणाऱ्या विकासकांनी घर किंवा फ्लॅट विक्री पोटीचा मुद्रांक शुल्क भरणा विकासकामे स्वतः करावा असे राज्य शासनाने आदेशात म्हटले असूनही विकासकांनी मात्र प्रीमियम शुल्काची सवलत तर घेतली पण ग्राहकाने मुद्रांक शुल्क भरलेलेच नाही ते विकासकांनी ग्राहकांकडूनच वसूल केले आहे असा आरोप मुंबई ग्राहक पंचायतने केला आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, बांधकाम व्यावसायिकांनी अशाप्रकारे प्रीमियममध्ये सवलत घेतल्याचे त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर करणे आवश्यक आहे त्यानंतर ग्राहकांच्या मुद्रांक शुल्काचा भरणा स्वतः करून ग्राहकांना तसे प्रमाणपत्र द्यावे व मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या ग्राहकांची यादी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करून त्यानंतर ती यादी महारेराकडे जमा करावी असे यासंबंधीत आदेशात नमूद केलेले असतानाही जवळपास एकाही विकासकाने ग्राहकांना हा लाभ दिलेला नाही. यामुळे संपूर्ण महामुंबई क्षेत्रात तीन हजार कोटी रुपयांची

फसवणूक झाल्याचा प्राथमिक अंदाज मुंबई ग्राहक पंचायतीने व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई ग्राहक पंचायतने महारेराला केलेल्या सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी केली आली आहे व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे. परंतू सदर पत्रात तीन हजार कोटी रूपयांचा उल्लेख नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे. परंतू सदर पत्रात तीन हजार कोटी रूपयांचा उल्लेख नाही.

(४) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे नोंदणीकृत प्रकल्पातील ग्राहकांना प्रकल्पाविषयी काही तक्रार असेल तर सदर ग्राहक नियमांनुसार ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात. सदर तक्रारीवर महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडून सुनावणी घेऊन निर्णय/ आदेश पारित केले जातात, असे प्राधिकरणाच्या अहवालात स्पष्ट केले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी पश्चिम द्रुतगती (मुंबई) महामार्ग येथील उड्डाणपुलाच्या मोकळया जागेत उद्यान बांधण्याबाबत

**(३९) * ४२४१७ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील पश्चिम द्रुतगती महामार्ग, जोगेश्वरी वाहतूक पोलीस चौकी, सिप्झ गेट क्रमांक ३ समोर, जेव्हीएलआर, आरे जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग, ओबरॉय मॉल, पश्चिम द्रुतगती महामार्ग येथील

उड्डाणपुलाच्या मोकळया जागेत मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत आहेत तसेच तेथे अनेक नादुरूस्त वाहने अनधिकृतरित्या उभी करण्यात येत असल्याने या मार्गावरून प्रवास करताना वाहतुक कोंडी निर्माण होत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उड्डाणपुलाखाली अनधिकृत बांधकाम करून वास्तव्यास असलेले लोक त्यांचे प्रात:विधी याच परिसरात करीत असल्याने सदरहू परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण होवून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू उड्डाणपुलाखालील अनधिकृत बांधकामे तातडीने निष्कासित करून तसेच या जागेवर अनधिकृतरित्या उभी करण्यात आलेली जुनी व नादुरूस्त वाहने हटवून या उड्डाणपुलाखालील जागेचे सुशोभिकरण करुन आकर्षक रचनेची उद्याने बांधून ती जनतेकरिता खुली करण्याकरिता आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचेकडे माहे जून, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निवेदनाचे अनुषंगाने या ठिकाणी उद्याने बांधण्याकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) पश्चिम द्रुतगती मार्गावरील जे.व्ही.एल.आर. उड्डाणपुलाखाली वाहतुक विभागाची पोलीस चौकी असून वाहतुक विभागामार्फत रस्त्यावरील अनधिकृत वाहने व बंद पडलेली वाहने आणुन उड्डाणपुलाखाली ठेवण्यात येतात. तसेच, जे.व्ही.एल.आर., आरे व ऑबेरॉय मॉल जवळील उड्डाणपुलाखाली मेट्रो लाईन-७, मेट्रो लाईन-६, मेट्रो सिस्टीम यांचे कार्यालय मेट्रो प्रकल्पा संबंधित व संबंधित स्थापत्य कामे मंजुराची राहण्याची व्यवस्था केलेली आहे. तेथे कुठल्याही प्रकारे अनधिकृत बांधकामे केलेली नाहीत, असे मुं.म.प्र.वि.प्रा. ने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सिप्झ गेट क्र.३ समोर, जे.व्ही.एल.आर. उड्डाणपुलाखालील जागेचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. तसेच, सदर ठिकाणी मोकळ्या जागेत कोणतेही अनधिकृत बांधकाम झालेले नाही. परंतू, सदर ठिकाणी काहीवेळा बेघर लोक वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) पश्चिम द्रुतगती महामार्गावरील जेव्हीएलआर, आरे व ऑबेरॉय मॉल जवळील उड्डाणपुलाखालील वाहतुक विभागाची पोलिस चौकी, मेट्रो लाईन-७ व मेट्रो लाईन-६ यांचे कार्यालयानी कर्मचाऱ्यांसाठी शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे, असे मुं.म.प्र.वि.प्रा. ने कळविले आहे.

तसेच, सिप्झ गेट क्र.३ समोर, जे.व्ही.एल.आर. उड्डाणपुलाखालील जागेवर काहीवेळा वास्तव्य करणारे बेघर लोक प्रातःविधीकरिता अंदाजे ५० ते १०० मीटर अंतरावर असलेल्या सार्वजनिक शौचालयांचा वापर करतात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) जेव्हीएलआर, आरे व ऑबेरॉय मॉल जवळील उड्डाणपुलाखाली मेट्रो लाईन-७ व मेट्रो लाईन-६ चे कार्यालय व तेथुन काम करण्यात येते. मेट्रो लाईन-७ व मेट्रो लाईन-६ चे काम पुर्ण होईपर्यंत तेथे सदरहू कार्यालय व मजुरांना राहण्यासाठी जागेची आवश्यकता आहे.

उड्डाणपुलाखालील जागेवर आकर्षक रचनेची उड्डाने बांधुन ती जनतेकरिता खुली करण्याकरिता आवश्यक त्या निधीची तरतुद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचेकडे माहे जुन, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केल्याबाबत या कार्यालयास असे निदर्शनास आले नसल्याचे मुं.म.प्र.वि.प्रा. ने कळविले आहे.

परंतु, मुं.म.प्र.वि.प्रा. ने दिनांक २०/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये आरे जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग, ऑबेरॉय मॉल, पश्चिम महामार्ग या उड्डाणपुलाखालील मोकळी जागा सुशोभिकरणाकरिता मे.ऑबेरॉय रियल्टी यांना वाटप करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषदेतील रस्त्याची कामे करण्याबाबत

**(४०) * ४२४५१ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषदेमध्ये भुयारी गटारे व रस्ते यासाठी शासनाकडून सन २०२१-२२ मध्ये निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रभाग क्र.६ मधील बोंबले हनुमान चौक ते बार्शी नाका रस्ता हा अत्यंत रहदारीचा असून तेथील रस्त्याची दुरवस्था झालेली आहे तसेच या रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास होत असुन प्रवासाचाही त्रास मोठ्या प्रमाणात होत असुन येथे अपघाताची संख्याही वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नगर परिषदेअंतर्गत भुयारी गटारे मंजूर असतांना शहरातील प्रभाग क्र.६ मध्ये बोंबले हनुमान ते बार्शी नाक्यापर्यंत रस्त्यांच्या लगत गटाराचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या परिसरातील नागरिकांना प्रवास सुखकर व्हावा व शासनाच्या निधीचा योग्य व वेळेत वापर व्हावा यासाठी येथील रस्त्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत उस्मानाबाद शहराच्या मलनिस्सारण (टप्पा-१) प्रकल्पास तसेच वैशिष्ट्यपुर्ण विशेष अनुदान योजनेंतर्गत रस्त्यांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे हे खरे आहे.

(२) प्रभाग क्र.६ मधील बोंबले हनुमान चौक ते बार्शी नाका हा रस्ता सुस्थितीत नसल्याचा तसेच, नागरीकांच्या सोईसाठी रस्त्याची डागडूजी व दुरूस्ती त्वरीत करण्यात येत असल्याचा अहवाल मुख्याधिकारी, उस्मानाबाद यांनी सादर केला आहे.

(३) नगरोत्थान योजनेंतर्गत उस्मानाबाद नगरपरिषदेकरीता प्रकल्प डिसेंबर, २०२१ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. मात्र हद्दवाढ योजनेंतर्गत प्रभाग क्र.६ मधील बोंबले हनुमान ते बार्शी नाका पर्यंत रस्त्यांच्या लगतच्या नालीचे बांधकाम त्यापुर्वीच म्हणजे सन २०२० मध्ये पुर्ण करण्यात आले आहे.

(४) व (५) ज्या शहरामध्ये पाणी पुरवठा / मलनिस्सारण प्रकल्प राबवले जात असतील अशा शहरांमधील रस्त्यांची कामे ठरावीक क्षेत्रात पाणीपूरवठा / मलनिस्सारण प्रकल्पाशी संबंधित कामे करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दिनांक ११ मे, २०१७ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

त्यामुळे उस्मानबाद नगरपरिषदेस मंजूर मलनिस्सारण प्रकल्पाची ठरावीक क्षेत्रात कामे पुर्ण झाल्यानंतर त्या त्या क्षेत्रातील रस्त्याची कामे हाती घेण्याचे उस्मानाबाद नगरपरिषद यांचे नियोजन आहे.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कृषी सेवा मुख्य परीक्षेच्या नवीन अभ्यासक्रमाचा फेरविचार करण्याबाबत

**(४१) * ४४०१० श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त परीक्षांतर्गत होणाऱ्या कृषी सेवा मुख्य परीक्षेचा नवीन अभ्यासक्रम दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार बी.एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या / वनविद्या / सामाजिक विज्ञान / बी.टेक.कृषी अभियांत्रिकी / बी.टेक. जैवतंत्रज्ञान या विद्याशाखांच्या पदव्या बी.एससी. (ऑनर्स) कृषी या पदवीशी समतुल्य समजण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकसेवा आयोगाने जाहीर केलेल्या उपरोक्त अभ्यासक्रमात बी.एससी. (ऑनर्स) कृषी या पदवी अभ्यासक्रमाला झुकते माप देण्यात आले असून पेपर १ व २ मिळून ४०० गुणांपैकी साधारणतः त्या अभ्यासक्रमाचे सुमारे २४८ गुण व बी.टेक.(ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे सुमारे १३६ गुण असे भारांकन निश्चित करण्यात आले असून या १३६ गुणांमध्येही सर्वसाधारण कृषी विषयक अभ्यासक्रमाचा समावेश असून निव्वळ कृषी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे म्हणता येतील अशा केवळ १६ गुणांचाच समावेश आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे बी.टेक. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असल्यामुळे तसेच कृषी विभागामधील शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजनांचे स्वरूप बी.टेक. (ऑनर्स) कृषी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाशी निगडीत असल्याच्या वस्तुस्थितीचाही विचार करून, परीक्षांच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी, या अभ्यासक्रमाचा पुनर्विचार करावा, अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य कृषी अभियांत्रिकी संघटनेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच सर्व संबंधित विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना समान न्याय मिळण्यासाठी अभ्यासक्रमाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने आयोगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२० द्वारे लोकसेवा आयोगाची कार्ये विहित केली असून सदर कार्ये कोणत्याही बाहय दबावाविना निकोप व पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता उचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचे संपूर्ण अधिकार आयोगास आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगास असणाऱ्या सदर अधिकाराच्या आधारे त्यांनी कृषी सेवा संवर्गांच्या परीक्षेचा अभ्यासक्रम वेळोवेळी त्यांच्या स्तरावर निर्धारीत केला आहे. सदर अभ्यासक्रमात २०१६ मध्ये आयोगाने त्यांच्या स्तरावरुन काही सुधारणा केल्या. तद्नंतर अनेक उमेदवारांनी

सदर अभ्यासक्रम सुधारित करण्याबाबत आयोगाकडे निवेदने सादर केली. आयोगास प्राप्त झालेली सर्व अभिवेदने तसेच अभ्यासक्रमाबाबत या विषयातील तज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन कृषि सेवा मुख्य परीक्षेचा नवीन अभ्यासक्रम दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केला.

(५) आयोगाने त्यांच्या स्तरावर सुधारित अभ्यासक्रम प्रसिध्द करण्यापूर्वीची प्राप्त झालेली सर्व अभिवेदने विचारत घेऊन मा.आयोगाने कृषी सेवा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रमाबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेऊनच सदर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. सदर अभ्यासक्रमात फेरविचार करण्याचा सध्या आयोगाचा मानस नाही.

-----------------

## कुर्ला (पश्चिम) मुंबई येथील महानगरपालिकेची शौचालये जमीनदोस्त करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४२) * ४११५७ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कुर्ला पश्चिमेकडील लाल बहादुर शास्त्री मार्गालगतच्या मायकल शाळेमागे असलेली मुंबई महानगरपालिकेची शौचालये जमीनदोस्त करून त्या जागी अनधिकृत बांधकाम केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी भूमाफीयांनी रातोरात शौचालये जमीनदोस्त करुन त्याजागी अनधिकृत बांधकामे सुरु करण्याच्या उद्देशाने जमिनीच्या बाजूने हिरव्या रंगाचे आच्छादन लावण्यात आले आहे तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणारे लोखंडी साहित्य मोठया प्रमाणात आणण्यात आले असून या जागेवर कब्जा करण्याचा प्रयत्न होत असताना महापालिका प्रशासनाकडून सदरहू अनधिकृत बांधकामाविरोधात आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात एल वॉर्डच्या सहाय्यक आयुक्तांशी तेथील नागरिकांनी संपर्क साधून विनाविलंब ठोस कारवाई करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली असून तत्संदर्भात काहीच दाद मिळत नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असुन नाराजी व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सर्व संबधित दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू ठिकाणी शौचालय बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) लाल बहादूर शास्त्री मार्गालगतच्या मायकल शाळेमागील शौचालये जमीनदोस्त केल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दूरध्वनीद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन केलेल्या स्थळपाहणीत, सदर खाजगी जागेवरील ८ शौचकुपे असलेले सार्वजनिक शौचालय अंदाजे १५ ते २० वर्षांपूर्वी म्हाडा प्राधिकरणामार्फत बांधण्यात आल्याचे व सदर सार्वजनिक शौचालय मागील ४ ते ५ वर्षांपासून वापरात नसल्याने बंद अवस्थेत असल्याचे चौकशीअंती बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळले.

सदर शौचालय अनधिकृतपणे जमीनदोस्त करुन त्याठिकाणी कुंपणाचे बांधकाम सुरु केल्याबाबत विनोबा भावे नगर पोलीस स्थानक, कुर्ला (पश्चिम) यांना संबंधित जागा मालकावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील कलम ५२(४३) अन्वये गुन्हा नोंद करण्याकरिता दिनांक २२.१२.२०२१ रोजी कळविण्यात आले आहे.

तद्नंतर संबंधित जागा मालकाने सदर ठिकाणी पुन:श्च अनधिकृत बांधकाम सुरु केल्याचे निदर्शनास येताच सदर अनधिकृत बांधकाम धारकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ (अ) अन्वये दिनांक ०२.०२.२०२२ रोजी नोटीस देऊन, सदर अनधिकृत बांधकाम दिनांक १८.०२.२०२२ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

तसेच, सदर परिसराचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले असता, त्या भागात लोकांना वापरण्यायोग्य शौचालये अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन शौचालय बांधण्याचे सद्य:स्थितीत प्रस्तावित नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (मुंबई) येथील इस्माईल युसुफ महाविद्यालयात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविताना शासकीय निधीचा दुरूपयोग केल्याबाबत

**(४३) * ४२४३८ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील इस्माईल युसुफ महाविद्यालयात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात जवळपास १ कोटी ९८ लाख ५ हजार १६१ रूपये खर्च करून २८८ सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सी.सी.टि.व्ही. कॅमेरे सन २०२१ मध्ये आलेल्या तौक्ते वादळात नादुरूस्त झाल्याने सदरहू सी.सी.टि.व्ही. कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीकरिता पुन्हा जवळपास १० लाख ८४ हजार रूपयांचा खर्च करण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत काढण्यात आलेल्या निविदेत कॅमेरे बसविल्यानंतर ते नादुरूस्त झाल्यास ते दुरूस्त करून देण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची किती कालावधीपर्यत राहिल याबाबत कोणताच उल्लेख करण्यात आला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तसेच सदरहू सी.सी.टि.व्ही. कॅमेरे यंत्रणेसाठी करण्यात आलेल्या खर्चाचे व कामाचे त्रयस्थ संस्थेकडून परिक्षण करण्यात आले असता सी.सी.टि.व्ही. कॅमेऱ्यांकरिता आकारण्यात आलेली किंमत ही बाजारमूल्यावर आधारित नसल्याची तसेच कॅमेऱ्यांच्या देखभालीसाठी आकारलेली रक्कम ही तुलनात्मक जास्त असल्याची बाब निदर्शनास आली असून संबंधित ठेकेदाराकडून शासनाची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करून या प्रकरणी संबंधित ठेकेदार व सदरहू निविदा प्रक्रियेस जबाबदार असणारे संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात १०४ नग सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविले असून संलग्न ॲसेसरीज व देखभाल दुरुस्ती खर्चासह रु.१,१०,७१,४४४/- इतका खर्च झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तौक्ते चक्रीवादळामुळे १२ सी.सी.टि.व्ही.कॅमेरे क्षतीग्रस्त झाले आहे. तौक्ते चक्रीवादळ व अन्य कारणांमुळे कॅमेरे क्षतीग्रस्त झाल्याने व त्यांचा वाव देखभाल व दुरुस्ती अंतर्गत येत नसल्याने सदर कॅमे-याच्या दुरुस्तीचे रु.१०.८४ लक्ष किमतीचे अंदाजपत्रक प्राचार्य, इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी पूर्व, मुंबई यांना सादर करण्यात आले आहे. त्याबाबत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

निविदा तरतुदीनुसार कामाचा दोष दायित्व कालावधी ३६ महिने आहे. याव्यतिरिक्त त्यापुढील २४ महिन्यांसाठी देखभाल व दुरुस्तीची तरतुद निविदेत आहे.

(४) या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्रयस्थ संस्थेकडून परिक्षण करण्यात आलेले नाही. सार्वजनिक बांधकाम नियमावली आणि वेळोवेळी निर्गमीत मार्गदर्शक सूचनेनुसार खुल्या बाजारातून दरपत्रके मागविण्यात आली असून न्यूनतम दरावर आधारीत अंदाजपत्रकानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम दर सादर केलेल्या अभिकरणास कार्यादेश देण्यात आले आहेत.
(५) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.११.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी पूर्व, मुंबई प्रशासनास दिले असून त्याची प्रत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद शहरातील कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याच्या कामात झालेली अनियमितता

**(४४) * ४२४५३ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरातील सर्वे नंबर ३४८ मधील कचरा डेपोतील कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याच्या कामात अनियमितता होऊन गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार उपनगराध्यक्ष व इतर लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वे नंबर ३४८ मधील कचरा डेपोतील कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी रुपये २ कोटी २० लक्ष किंमतीची निविदा अंतिम करून 'सेव एन्व्हायरमेंट मॅनेजमेंट अँड इंजिनिअरिंग प्रा.लि.' या कंपनीला दिनांक २५ जुलै, २०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहा महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करण्याचे निविदेमध्ये नमूद केले केले असताना, कार्यारंभ आदेश देऊन दोन वर्षाचा कालावधी उलटूनही व संबंधित कंत्राटदाराला यातील जवळपास रुपये २ कोटी अदा करण्यात आले असतानाही कचऱ्याची परिस्थिती आजही 'जैसे थे' च आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामात कंत्राटदाराने बोगस काम दाखवून राजकर्त्यांच्या सहकार्याने पैशाचा मोठा गैरव्यवहार केला असून, त्यामुळे बायोमाइनिंग न झाल्यामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे, तर कचरा डेपोला लागलेल्या आगीमुळे धुराचे प्रचंड लोट येत असून पर्यावरणाची हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कंपनीने काम केले असल्यास प्रक्रिया केलेला उपयुक्त घन कचरा किती व त्याचा वापर कोठे करण्यात आला आहे, याची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने सदर प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे अंशतः खरे आहे.

उस्मानाबाद शहरातील सर्व्हे नं.३४८ येथील कचरा डेपोतील एकूण २,३४,१९० घ.मी. कचऱ्यापैकी, ५२,४४० घ.मी. कचऱ्यावर बायोमायनिंग करण्याकरीता न्युनतम निविदाधारक “सेव्ह एन्व्हायरमेंटल मॅनेजमेंट ॲण्ड इंजिनिअरिंग प्रा. लि.” या कंपनीस दि.२५ जुलै, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आले. त्यानुसार सदर कंत्राटदाराने सदर काम दि. ०४ मार्च, २०२० रोजी पुर्ण केले आहे. त्याकरीता सदर कंत्राटदारास रु.२,२२,८६,९६०/- इतके देयक अदा करण्यात आले आहे. तसेच उर्वरित १,८१,७५० घ.मी. कचऱ्यावर बायोमायनिंगचे काम करण्याकरीता स्वतंत्रपणे रु.७.७२ कोटीच्या किंमतीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे सादर करण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.

कचरा डेपोमध्ये लागलेली आग अग्निशमन दलामार्फत तात्काळ विझवण्यात येते. तसेच कचऱ्यावर दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी नगरपरिषदेमार्फत वारंवार करण्यात येते.

(५) हे खरे आहे.

कचरा डेपोमधील ५२,४४० घ.मी. कचऱ्याचे बायोमायनिंग केल्यानंतर निघालेले खत लिलावाद्वारे स्थानिक शेतकऱ्यांना किरकोळ दराने विक्री करण्यात आले असून, ओल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.